रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८९▌अंक २२३ ▌पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# शिंदेंना हवेय अडीच वर्षे महापौरपद?

**मुंबई :** मुंबई महापालिकेत भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असला तरी कुठल्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. मात्र, भाजप-शिवसेना महायुतीने मुंबई महापालिकेत स्पष्ट बहुमताचा आकडा गाठला असून, भाजपने ८९ तर तर शिंदेंच्या शिवसेनेने २९ जागा जिंकल्या आहेत. मात्र, निकालानंतर शिंदेंनी आपल्या नगरसेवकांना एका हॉटेलमध्ये ठेवल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. त्यातच, शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाकडून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या मुंबईतील नगरसेवकांना संपर्क साधला जात पान २ वर

कृषीवल

रायगड, सोमवार, दि. १९ जानेवारी २०२६

किंमत ४₹

# ज्येष्ठ नागरिकाची कोट्यवधींची फसवणूक

**पनवेल :** खारघर येथील एका नामवंत शैक्षणिक संस्थेतील ८० वर्षीय निवृत्त संचालकाची तब्बल ४ कोटी ३८ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. हे निवृत्त संचालक खारघर सेक्टर-१२ मध्ये वास्तव्यास असून, ते राजस्थान-जयपूर येथील एका नामांकित इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूटमधून संचालकपदावरून निवृत्त झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, १८ नोव्हेंबर २०२५ रोजी सायबर डेटा प्रोटेक्शन ऑफ इंडियामधील अधिकारी असल्याचे सांगत एका सायबर गुन्हेगाराने त्यांच्या मोबाईलवर संपर्क साधला. तसेच, त्यांच्या आधारकार्डचा गैरवापर करून बनावट सिमकार्ड घेतले असून, त्यावरून मोठ्या प्रमाणात पान २ वर

# शिव्या देणाऱ्यांना जिजाऊ पुरस्कार हा जिजाऊंचा अपमान

- **शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांचे मानसी दळवी यांच्यावर टीकास्त्र**
- **थळ जिल्हा परिषद मतदार संघातून उच्च शिक्षित उमेदवाराची घोषणा**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

राजमाता जिजाऊंनी महाराष्ट्राला सुसंस्कार, शिस्त, आणि चारित्र्याची शिकवण दिली. जिजाऊ कधीही शिवीगाळ करणाऱ्या नव्हत्या. आज मात्र शिव्या देणाऱ्यांनाच जिजाऊ पुरस्कार दिला जातो, ही अत्यंत दुर्दैवी बाब असून, तो राजमाता जिजाऊंचाच अपमान आहे, अशी घणाघाती टीका शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी शिंदे गटातील मानसी दळवी यांच्यावर केली. अलिबाग थळ जिल्हा परिषद मतदार संघातील उमेदवारी जाहीर करताना जयंत पाटील बोलत होते. ज्या व्यक्तीच्या वागण्यातून संस्कारांचा अभाव दिसतो, अशा व्यक्तींना जिजाऊंच्या नावाचा पुरस्कार देताना जिजाऊंनाही वेदना झाल्या असत्या, असा टोला लगावत त्यांनी सध्याच्या राजकारणाच्या अधोगतीवर गंभीर भाष्य केले.

दरम्यान, जयंत पाटील यांनी जिल्हा परिषद थळ मतदार संघासाठी शेकापच्या उमेदवार म्हणून सानिका सुरेश घरत यांची घोषणा करीत एक सुशिक्षित व उच्च शिक्षित उमेदवार पान २ वर





## सानिका घरत यांची उमेदवारी जाहीर

राजिप निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. अलिबाग तालुक्यात ७ जिल्हा परिषद गट व १४ पंचायत समिती गण आहेत. थळ जिल्हा परिषद मतदार संघासाठी (गट) शेकापच्या उमेदवार सानिका सुरेश घरत यांची निवड केल्याचे शेकाप सरचिटणिस जयंत पाटील यांनी जाहीर केले. सानिका घरत या शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांची कन्या आहेत. त्या वकिलीचे शिक्षण घेत असून, उच्च शिक्षित उमेदवार आहेत. त्यांची जि.प. थळ मतदार संघासाठी उमेदवार म्हणून निवड जाहीर झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## थळ मतदारसंघात परिवर्तन अटळ: चित्रलेखा पाटील



थळ मतदार संघातील जनता अनेक वर्षे विकासापासून वंचित आहे. रस्ते, पाणी, रोजगार, कोळीवाड्यांचे प्रश्न आजही जैसे थे आहेत. सत्ताधाऱ्यांनी फक्त आश्वासने दिली, प्रत्यक्ष काम केले नाही. त्यामुळे येथील जनता प्रचंड कटाळलेली आहे. सानिका घरत यांच्या रुपाने शेतकरी कामगार पक्षाने सुसंस्कृत, अभ्यासू आणि लोकाभिमुख उमेदवार दिला असून या निवडणुकीत परिवर्तन निश्चित होणार आहे, असा ठाम विश्वास शेकाप राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त करुन सानिका घरत यांना बहुमतांनी निवडून देण्याचे आवाहन केले. तसेच, गेल्या अनेक वर्षांपासून शेकापचे तालुका चिटणीस सुरेश घरत पान २ वर

## निवडणुकीत प्रत्येकाचे योगदान मोलाचे : ॲड. मानसी म्हात्रे

सुरेश घरत यांनी आरसीएफविरोधात आंदोलन केले, किमान वेतनासाठी लढा दिला. पाणी, रस्ते, कोळी बांधवांच्या जेट्टीसाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या संघर्षाची आणि कामाची दखल घेऊन सानिका घरत यांना उमेदवारी देण्यात आली आहे. या लढतीत प्रत्येक कार्यकर्त्याचे योगदान मोलाचे असून, ही निवडणूक अत्यंत गांभीर्याने लढवावी, असे आवाहन ॲड. मानसी म्हात्रे यांनी केले. पान २ वर



## निवडणुकीत चांगले यश येणार: प्रदीप नाईक

शेकापने तालुक्यात संघटन मजबूत केले आहे. आज धनशक्तीचा प्रचंड वापर होत असला, तरी जनतेच्या प्रश्नांवर लढणाऱ्या कार्यकर्त्यांसमोर ती टिकणार नाही. सानिका घरत या उमेदवारीतून शेकापने योग्य निर्णय घेतला असून, या निवडणुकीत त्यांना चांगले यश मिळेल, असा विश्वास शेकाप कामगार आघाडी प्रमुख प्रदीप नाईक यांनी व्यक्त केला. तसेच, शेतकरी कामगार पक्षाला तालुक्यात एक वर्षापूर्वी पान २ वर



## वेधक

### पनवेलच्या भाविकांवर काळाचा घाला

**पनवेल :** पुणे-सोलापूर महामार्गावर मोहोळजवळ देवडी पाटीमध्ये रात्रीसाडे अकरा वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात झाला. पनवेल येथून अक्कलकोट येथे देवदर्शनासाठी निघालेली वाहन चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने वाहन रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर जोरात आदळले. यामध्ये पाच जणांचा मृत्यू झाला असून, एक महिला जखमी आहे. या अपघातग्रस्त कारमध्ये तीन पुरुष व तीन महिला असे एकूण सहा प्रवासी प्रवास होते. या अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये नविन पनवेल येथील पान २ वर

### ज्येष्ठ नागरिकाचा अपघाती मृत्यू

**पनवेल :** खारघरमधील उत्सव सर्कलजवळ भरधाव सिमेंट काँक्रिट बल्करने मोटारसायकलला धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात मोटारसायकलवरील व्यक्ती सिमेंट बल्करच्या चाकाखाली आल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. खारघर पोलिसांनी सिमेंट बल्कर चालकाविरोधात गुन्हा दाखल करुन त्याला ताब्यात घेतले आहे. या अपघातात मृत झालेल्या व्यक्तीचे नाव अशोक मादापाटील (६६) असे असून, ते खारघर येथे वास्तव्यास होते. ते कामानिमित्त आपल्या मोटारसायकलवरुन सेंट्रल पार्ककडून खारघर हायवेकडे जात होते.

### मोदी हे गझनी आहेत : हर्षवर्धन सकपाळ

**मुंबई :** मोदी हे गझनी आहेत. ते मनिकर्णिका घाट पाडत आहे. त्यामुळे त्यांचा मी निषेध करतो. गझनीने जशी घाटावरील मंदिरे पाडली, तशीच मोदी पाडत आहेत, अशी टीका हर्षवर्धन सकपाळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केली आहे. काशीतील प्राचीन मंदिरे आणि मनकर्णिका घाटाच्या पाडकामावरून मोदी सरकारवर टीका होत आहे. भाजपला देशातील प्राचीन मंदिरे तोडायची आहेत. त्यांना देशाची इतिहास व ओळख पुसायची असून, स्वतःचाच इतिहास रचायचा आहे. असा आरोप करत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी नरेंद्र मोदी आणि भाजपवर निशाणा साधला आहे.

# खासगी वनजागेत टॉवरचे अनधिकृत बांधकाम

- **वन विभागाकडे तक्रार करूनही कारवाई करण्यास टाळाटाळ**
- **आगरी समाज शेतकरी प्रबोधिनी मूरूड तालुका संघटनेचा आरोप**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

एखाद्या शेतकऱ्याने वनजमिनीमध्ये गुरांसाठी गोठा बांधल्यास वन विभाग त्यांच्याविरोधात तात्काळ कारवाई करतात. मात्र, मूरूड तालुक्यातील राजपूरी येथील खासगी वन जागेत काही कंपन्याचे अनधिकृत मोबाईल टॉवर उभारले जात आहेत. त्यांच्याविरोधात कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करून ही वन विभाग कारवाई करण्यास टाळाटाळ करीत असल्याचा आरोप आगरी समाज शेतकरी प्रबोधिनी मुरूड तालुका संघटनेच्यावतीने ॲड. विनायक शेडगे यांच्याकडून करण्यात आला आहे. वन परिक्षेत्र अधिकारी यांच्याकडून फक्त बघ्याची भूमिका घेतली जात आहे. त्यामुळे या प्रकाराबाबत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.



> राजपुरी येथील जागेत टॉवर उभारणीचे काम होत असल्याची तक्रार प्राप्त झाली आहे. ती जागा खासगी वन विभागाच्या अखत्यारित येते, असेही तक्रारीत नमूद केले आहे. संबंधित जागेची मोजणी करण्यासाठी भूमीअभिलेख विभागाकडे मागणी केली आहे. मोजणीनंतर जागा निश्चित करून संबंधिताविरोधात कारवाई केली जाईल.
>
> - वर्षा पॉल, वनपरिक्षेत्र अधिकारी, मुरूड

ॲड. शेडगे यांच्या तक्रारीनुसार, राजपुरी येथील गट नं. १३९/१० 'अ' या महाराष्ट्र शासन खासगी वने असा शेरा असलेल्या जमिनीवर एअरटेल कंपनीकडून अनधिकृत टॉवरचे बांधकाम सुरु करण्यात आले आहे. या मोबाईल टॉवरमधील अनावश्यक लहरीमुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होण्याची भीती आहे. कोणतीही खातर जमा न करता, बेकायदेशीररित्या खासगी वन जमिनीमध्ये हे टॉवर उभारण्याचे काम सुरु केले आहे. खासगी वनांच्या जमिनीचे संरक्षण करण्यासाठी पान २ वर

# एच.पी. अधेसिव्हस् कंपनीत आग

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील नारंगी येथील एच.पी. अधेसिव्हस् कंपनीच्या स्टोअर विभागात शनिवारी (दि.१७) सायंकाळी साडेसात वाजताच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली. यावेळी आगीतील स्फोटक आवाजाने परिसर दणाणून गेला होता. रात्रभर गावातील महिला, तरूण वर्ग कंपनी समोर ठाण मांडून बसले होते. तब्बल ५ तास ३० मिनिटांच्या अथक प्रयत्नानंतर ही आग नियंत्रणात आणण्यात अग्निशमन दलांना यश आले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, मोठ्या प्रमाणावर वित्तहानी झाल्याचा अंदाज आहे.



- **साडेपाच तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आग आटोक्यात**
- **रात्रभर गावकरी कंपनीसमोर ठाण मांडून बसले**

कंपनीला आग लागल्यानंतर खालापूर पोलीस, हेल्प फाऊंडेशनची रेस्क्यू टीम तसेच परिसरातील विविध औद्योगिक अग्निशमन दल तत्काळ घटनास्थळी दाखल झाले होते. आलाना ऑइल, रिलायन्स, टाटा स्टील, ए.एम./एन.एस. स्टील, पेण नगरपरिषद, गोदरेज कंपनी, खोपोली नगरपरिषद तसेच मंगलम् कंपनी यांच्या फायर टेंडरच्या मदतीने पाणी व फोमचा सातत्याने वापर करीत आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे करण्यात आले. आग लागल्यानंतर सुमारे चार तासांनी कंपनीतील स्टोअर विभागालगत असलेल्या दुसऱ्या प्लॉटलाही आग लागली. यावेळी काही केमिकल ड्रम्सचा स्फोट झाला असून, आगीचे लोण तब्बल १० किलोमीटर अंतरावरूनही दिसत होते, अशी माहिती स्थानिकांनी दिली.

त्यामुळे नारंगी एमआयडीसी परिसरालगत असलेल्या नारंगी, गोरठण, स्वाली, पान २ वर

# पोलादपूरमध्ये सर्वपक्ष निवडणुकीच्या रिंगणात?

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

पोलादपूर तालुक्यातील मतदारांना विधानसभा निवडणुकीनंतर पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमुळे प्रचंड राजकीय उत्सुकता निर्माण झाली आहे. मात्र, येथील राजकीय पक्षांचा कल पाहता सद्यस्थितीत कोणतीही युती अथवा आघाडी होण्याची शक्यता अनेक वाटाघाटीनंतर दिसेनाशी झाली आहे. त्यामुळे अर्ज मागे घेण्याच्या मुदतीपूर्वी युती-आघाडीचे चित्र स्पष्ट होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

गेल्या महिन्यापासून तालुक्यातील महाविकास आघाडीचे आणि शिवसेनाविरोधी गटबंधनाचे नेते एकत्रितपणे विचारमंथन करून कोणत्याही निर्णयापर्यंत पोहोचलेले नाहीत. अखेरिस सर्व राजकीय पक्षांनी निवडणूक स्वतंत्रपणे लढण्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. दि.१६ व १७ जानेवारी रोजी पोलादपूर तहसिल कार्यालयामध्ये आतापर्यंत १६ जणांचे मागणी अर्ज दाखल झाले असून, ४६ नामनिर्देशनपत्रांचे वितरण झाले आहेत. यामध्ये जिल्हा परिषदेसाठी काँग्रेसतर्फे २, तर भाजप, शिवसेना, शेकाप, शिवसेना (उद्धव ठाकरे, मनसे व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे सहाही जागांवर उमेदवार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पान २ वर



● कर्नाटक राज्यातील म्हैसूर येथे संक्रांतीनिमित्त किच्चु हैसोडू सण मोठ्या उत्साहात साजरा होतो. या क्षणाची चित्रे टिपण्यासाठी महाराष्ट्रातील ज्येष्ठ सिने फोटोग्राफर संदीप यादव यांच्या मार्गदर्शनाखाली सुधीर नाझरे, गणेश मेमाणे म्हैसूर येथे गेले होते. हा सण मैसूर शहरापासुन १० किमी अंतरावर शिजलीपुरा गावात होतो. कर्नाटकातील ग्रामीण भागात, विशेषतः म्हैसूर आणि मंड्या जिल्ह्यात बैल आणि गाईंना सजवून त्यांना पेटवलेल्या पेंढ्यावरून पलिकडे धावडवले जाते. या कृतीमुळे पशुधनावरील कीटक, जुळे नष्ट होतात आणि त्यांना आजारांपासून संरक्षण मिळते. **(छायाचित्रः सुधीर नाझरे)**

# अधिकाऱ्याचा संशयास्पद मृत्यू

**बीड :** शनिवारी (दि.१७) एका जीएसटी अधिकाऱ्याचा मृतदेह अज्ञातस्थळी त्यांच्याच कारमध्ये संशयास्पद आढळून आला. त्यामुळे सर्वत्र खळबळ उडाली होती. बीड जवळील कपिलधारवाडी परिसरात राज्य कर अधिकारी सचिन जाधवर यांचा मृतदेह गाडीत आढळून आला, त्यानंतर या ठिकाणी पोलिसांकडून पंचनामा करण्यात आला. घटनास्थळी सुसाईड नोट आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे वरिष्ठांच्या जाचाला कंटाळून या अधिकाऱ्याने जीवन संपवल्याची प्राथमिक माहिती आहे. याच सुसाईड नोट आधारे संबंधिताची चौकशी केली जाणार आहे. तत्पूर्वी, या प्रकरणात पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

**सात एकरांतून लाखोंचे उत्पन्न | नितीन पाटील ठरले शेतकऱ्यांसाठी प्रेरणास्थान**

# रोह्यातील शेतकऱ्याची 'स्ट्रॉबेरी क्रांती'

**निलेश फुंडे**

**। रेवदंडा ।**

महाबळेश्वरची ओळख असलेली स्ट्रॉबेरी आता थेट रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यात फुलू लागली आहे. आधुनिक तंत्रज्ञान, सेंद्रिय शेती आणि जिद्दीच्या जोरावर रोह्यातील एका तरुण शेतकऱ्याने शेतीला नवे वळण दिले आहे. पारंपरिक भात शेतीसोबत स्ट्रॉबेरीची यशस्वी लागवड करून लाखोंचे उत्पन्न मिळवणारे शेतकरी म्हणजे फुगारेवाडी (रोहा) येथील नितीन पाटील. त्यांची ही यशोगाथा आज संपूर्ण तालुक्यात चर्चेचा विषय ठरत आहे.

रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील फुगारेवाडी गावातील शेतकरी नितीन पाटील यांनी महाबळेश्वरच्या विंटर डॉन जातीच्या स्ट्रॉबेरीची यशस्वी सेंद्रिय लागवड करून शेती क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला आहे. पान २ वर

## भात शेतीसोबत स्ट्रॉबेरीचा यशस्वी संगम

**नितीन पाटील यांनी पारंपरिक भातशेती सोडलेली नसून, स्ट्रॉबेरीसह फुलझाडे, फळझाडे, भाज्या आणि औषधी वनस्पतींचीही सेंद्रिय लागवड केली आहे. विविध पिकांचा अवलंब केल्यामुळे त्यांचे उत्पन्न दुपटीने वाढले आहे.**



## कृषी विभागाचे कौतुक, शेतकऱ्यांचा उत्साह

रोहा कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी नितीन पाटील यांच्या बागेला भेट देऊन उत्पादनाची पाहणी केली आणि त्यांच्या प्रयोगाचे कौतुक केले. या यशामुळे फुगारेवाडी आणि परिसरातील शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या काही दिवसांत २० हून अधिक शेतकऱ्यांनी त्यांच्या बागेला भेट देऊन स्ट्रॉबेरी लागवडीची माहिती घेतली असून, काहींनी प्रत्यक्ष लागवडही सुरू केली आहे.

> महाबळेश्वरला जाण्याची गरज नाही. योग्य नियोजन, काळजी आणि आधुनिक तंत्रज्ञान वापरल्यास रोहा सारख्या भागातही स्ट्रॉबेरी यशस्वी होऊ शकते.
>
> - नितीन पाटील, शेतकरी

# मुंबई-पुणे मार्गावर भीषण अपघात

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मुंबई-पुणे महामार्गावर शनिवारी (दि.१७) रात्रीच्या सुमारास भीषण अपघात घडला. एका भरधाव ट्रकचा ब्रेक निकामी होऊन त्याने समोरील ट्रकला जोरदार धडक दिली. या अपघातात ट्रकमधील क्लीनरचा जागीच मृत्यू झाला असून, चालक गंभीर जखमी झाला आहे.

मुंबई-पुणे महामार्गावर अपघाताची मालिका सतत चालू असून, शनिवारी रात्रीच्या सुमारास सुहास सुखदेव गोफणे (३३) हे आपल्या ताब्यातील ट्रक घेऊन मुंबईकडे जात होते. यादरम्यान तो बोरघाटात आला असता ट्रकचे ब्रेक निकामी झाले आणि त्याने समोर धावणाऱ्या ट्रकला पाठीमागू जोरदार धडक दिली. यावेळी चालक सुहास गोफणे याला ट्रकचे ब्रेक निकामी झाल्याचे लक्षात येताच त्याने तात्काळ ट्रक बाहेर उडी मारली. त्यामुळे तो बचावला असून किरकोळ जखमी झाला. मात्र, त्या ट्रकमधील क्लीनर केबिनमध्ये अडकून गंभीर जखमी होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच बोरघाट पोलीस, आयआरबी टीम तात्काळ घटनास्थळी दाखल होत ट्रकच्या केबिनमध्ये अडकलेल्या क्लीनरला बाहेर काढले.

# पोलीस हवालदाराच्या मुलाची गरुडझेप



■ मंथन नरुटे बनला लष्करी अधिकारी

| खोपोली | प्रतिनिधी |

देशातील अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या यूपीएससीच्या एनडीए परीक्षेत रायगड जिल्ह्यातील पोलीस हवालदाराच्या मुलाने अव्वल क्रमांक पटकावत गरूडझेप घेतली आहे. मंथन नरूटे असे त्याचे नाव असून अधिकारी होण्याचे स्वप्न साकार केले आहे.

गतवर्षी एप्रिलमध्ये झालेल्या यूपीएससी एनडीए परीक्षेचा अंतिम निकाल ऑक्टोबरमध्ये जाहीर झाला. त्यात मंथनने ४९० क्रमांक मिळवत तो देशात अव्वल ठरला. त्यानंतर गुरूवारी (दि.१५) त्याची अधिकृतपणे एनडीए राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये निवड झाली आहे. ही परीक्षा भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलातील अधिकारी पदांसाठी घेतली जाते. या यशामुळे मंथन नरुटेची निवड ही रायगड जिल्ह्यासह पोलीस दलासाठीही अभिमानाची बाब ठरत आहे. त्याच्या यशाबद्दल संपूर्ण जिल्ह्यातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

मंथनचे प्राथमिक शिक्षण दहावीपर्यंत खोपोली येथील कर्नियल कॉन्व्हेंट स्कूल येथे झाले. दहावीनंतर इंजिनीअर किंवा डॉक्टर होण्याचा पारंपरिक मार्ग न स्वीकारता, लहानपणापासूनच असलेल्या यूपीएससी आणि देशसेवेच्या आवडीमुळे त्याने एनडीएची तयारी सुरू केली. त्याचे वडील संदीप नरुटे हे रायगड पोलीस दलात कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात हवालदार म्हणून कार्यरत आहेत. त्यामुळे त्याला गणवेशाबद्दल आणि देशसेवेबद्दल त्याच्या मनात विशेष आदर निर्माण झाला होता. या यशामागे त्यांची आई राणी यांच्या प्रचंड कष्टाचे आज चीज झाले आहे. एनडीएच्या तयारीसाठी त्याने एका प्रशिक्षण अकॅडमीत प्रवेश घेतला होता. पहिल्या तीन प्रयत्नांत तो एसएसबी मुलाखतीपर्यंत पोहोचला; मात्र, अंतिम निवड होऊ शकली नाही. तरीही अपयशाने खचून न जाता, बी.टेक इंजिनीअरिंगचे शिक्षण घेत असतानाच त्याने एनडीएचा अभ्यास सुरू ठेवला. अखेर चौथ्या प्रयत्नात त्याला यश मिळाले आणि भारतीय नौसेनेतील अधिकारीपदाची संधी मिळाली.

या निवडीनंतर रायगड पोलीस दलातील अधिकारी, कर्मचारी तसेच नातेवाईकांकडून मंथन आणि त्याच्या कुटुंबावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. आजच्या सोशल मीडियाच्या युगात देशसेवेसाठी सैन्यदलात जाणारे तरुण कमी होत असताना, एका हवालदाराचा मुलगा लाखो विद्यार्थ्यांमधून निवडला जाऊन यूपीएससीमार्फत लष्करी अधिकारी बनतो, ही बाब अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# तिवरे शाळेचे अभ्यास स्पर्धेत यश




| पाली /बेणसे | प्रतिनिधी |

शिक्षक कर्मचारी स्पर्धा २०२५ अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय व्यक्ती अभ्यास स्पर्धेत जिल्हा परिषद तिवरे शाळेचे उपशिक्षक रवींद्र आंधळे यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. संपूर्ण राज्यातून निवडण्यात आलेल्या १० सर्वोत्तम शिक्षकांमध्ये स्थान मिळवून त्यांनी सुधागड तालुक्याचा आणि विभागाचा नावलौकिक वाढवला आहे.

रवींद्र आंधळे यांनी या स्पर्धेच्या सुरुवातीच्या टप्प्यात तालुका स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला होता. त्यानंतर मुंबई विभागातही त्यांनी आपल्या कौशल्याची चुणूक दाखवत यश मिळवले. या कामगिरीच्या जोरावर त्यांची निवड नागपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी करण्यात आली होती. राज्यभरातून आलेल्या शेकडो स्पर्धकांमधून केवळ १० शिक्षकांची अंतिम निवडीसाठी निवड करण्यात आली होती. यामध्ये आंधळे यांनी दहावा क्रमांक प्राप्त केला आहे. त्यांच्या या यशामुळे शैक्षणिक क्षेत्रातून त्यांचे कौतुक होत आहे.



# बाळू मामा मंदिरात भक्तांची गर्दी

| खोपोली | प्रतिनिधी |

अमावश्या निमित्ताने श्रीसंत बाळू मामा मंदिर पांगोळी-लोणावळा येथे असंख्य भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी करत दर्शन घेतले. पुणे आणि रायगड जिल्ह्याच्या मध्यवर्ती असलेल्या लोणावळा-पांगोळी धनगरवस्ती येथे श्रीसंत बाळूमामा देवाचे भव्य मंदिर आहे. दर अमावश्येला या मंदिरात भंडारा असतो. त्याचप्रमाणे रविवारी (दि.१८) अमावश्या असल्याने सकाळ पासूनच मोठ्या प्रमाणात भाविक भक्तांनी दर्शना घेण्यासाठी गर्दी केली होती. सकाळी या मंदिरात श्रीचा दूधाभिषेक, होमहवन, दुपारी भजन आणि संध्याकाळी मामांच्या महाआरतीने सांगता करण्यात आली.

# जीवनदान महाकुंभ रक्तदान शिबीर

■ ८३ रक्तदात्यांनी जपली सामाजिक बांधिलकी

| नागोठणे | प्रतिनिधी |

जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या प्रेरणेने रोहा तालुक्यातील नागोठण्यातील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या श्रीमती शांतीबाई ओटरमल जैन आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज व आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शुक्रवारी (दि.१६) जीवनदान महाकुंभ रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात परिसरातील विविध गावांतील ८३ रक्तदात्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवून आपली सामाजिक बांधिलकी जपली. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कॉलेजच्या प्राचार्य ज्योती वैद्य यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पिगोंडेचे माजी सरपंच संतोष कोळी, प्रा. अक्षय ठाकुर, प्रा. अनघा मरळ, अरुण, शोभा पाटील, जगद्गुरु नरेंद्र महाराज संप्रदायाचे उत्तर रायगड जिल्हा सचिव प्रदीप मढवी, रोहा तालुकाध्यक्ष मिननाथ कटोरे, प्रोटोकॉल अधिकारी विक्रांत घासे, रोहा तालुका विशेष अधिकारी रमेश पारंगे, रोहा तालुका सचिव दयाराम ताडकर, प्रेमनाथ राक्षीकर, सुभाष ताडकर, रमेश धर्मा पारंगे, रोशन पारंगे, अंकुश ताडकर आदींसह जगद्गुरु नरेंद्र महाराज सांप्रदायाचे भक्तगण यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# काशिद समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांची रेलचेल

| कोर्लई | प्रतिनिधी |

मुरुड तालुक्यातील काशिद समुद्रकिनाऱ्यावर जानेवारी महिन्याच्या तिसऱ्या आडवड्यातील रविवारी (दि.१८) पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर रेलचेल दिसून आली. सकाळच्या वेळेत थंडी तर दुपार नंतर हवामानात बदल होत काही ठिकाणी ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. अशा मोसमात पर्यटकांनी समुद्रात पोहोण्याचा व सफरीचा मनसोक्त आनंद लुटला. काही दिवसांपासून थंडीमधे होणारा चढ उतार, अचानक वाढणारे तापमान याचा परिणाम पर्यटनावर दिसून येत होता. तरीदेखील या महिन्यात शालेय सहलींचा वाढता ओघ दिसून येत होता. यावेळी पुणे, सांगली, सातारा, कराड, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, औरंगाबाद, अहमदनगर, नाशिक, नागपूर, धुळे, यवतमाळ अशा अनेक जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात पर्यटकांनी भेट दिली.

पान १ वरून

## शिंदेंना हवेय अडीच वर्षे महापौर?

असल्याची चर्चा आहे. आपली बार्गेनिंग पॉवर वाढवण्यासाठी, अडीच वर्षे महापौरपद शिवसेनेला घेण्यासाठी हे सुरू असल्याचेही बोलले जात आहे.

ठाकरेंच्या संपर्कामुळे शिंदेंच्या शिवसेनेचे नवनिर्वाचित नगरसेवक मुंबईतील ताज लँड्स अँन्ड हॉटेलमध्ये ठेवण्यात आले आहेत. ठाकरेंच्या हालचालींमुळे शिंदेंना धोका किंवा संधी मिळेल, अशा चर्चा सुरु आहेत. बार्गेनिंग पॉवर वाढल्याने एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेकडून भाजपकडे महापौरपदाची मागणी क रण्यात आल्याच्या चर्चाही होत आहेत. स्थायी समितीसह इतर समित्यांसाठी देखील शिवसेना आग्रही राहू शकते. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरेंच्या जन्मशताब्दी वर्षामुळे मुंबईत शिवसेनेचा महापौर असावा, अशी एकनाथ शिंदेंची इच्छा आहे. त्यामुळे, अडीच वर्षे महापौरपद एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला मागण्यात येत असल्याची चर्चा आहे. मात्र, या चर्चेवर भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी भूमिका स्पष्ट केली आहे. ते म्हणाले की, आमचे पार्लमेंटरी बोर्ड आहे, तिथे जी काही मागणी आहे ती येईल, माझ्याकडे तरी काही मागणी आलेली नाही. आमच्या पार्टमेंटरी बोर्डच्या बैठकीत एकनाथ शिंदे हेही आहेत. आमच्या समन्वय समितीमध्ये देवेंद्रजी, अजितदादा आणि एकनाथ शिंदे हे एकत्रित बसून निर्णय घेतील. जर मागणी असेल तर एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत चर्चा करतील, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले.

## शिव्या देणाऱ्यांना जिजाऊ पुरस्कार हा जिजाऊंचा अपमान

सानिका घरत यांना निवडून देण्यासाठी कामाला लागा, असे आवाहन कार्यकर्त्यांना केले. हा विजय महाराष्ट्राच्या राजकारणात एक वेगळा इतिहास घडवेल, असेही ते म्हणाले.

रायगड जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर थळ जिल्हा परिषद मतदार संघातून शेकाच्या उमेदवार म्हणून सानिका सुरेश घरत यांची अधिकृत घोषणा जयंत पाटील यांनी रविवारी (दि.१८) अलिबागमध्ये रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभागृहात सभेच्यावेळी जाहीर केली. सानिका घरत या उच्चशिक्षित असून, वकिलीचे शिक्षण घेत आहेत. त्या शेकापचे तालुका चिटणीस सुरेश घरत यांची कन्या आहेत. महिला आरक्षित मतदार संघात केवळ घराणेशाही नव्हे, तर अनेक वर्षांच्या संघर्ष, जनसंपर्क आणि सामाजिक कामाची पार्श्वभूमी पाहून ही उमेदवारी देण्यात आल्याचे जयंत पाटील यांनी स्पष्ट केले.

यावेळी शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, शेकाप महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, शेकाप कामगार आघाडी प्रमुख ॲड. प्रदीप नाईक, शेकाप ज्येष्ठ नेते द्वारकानाथ नाईक, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, थळ जिल्हा परिषद मतदार संघातील शेकाप उमेदवार सानिका घरत, अलिबागचे नगरसेवक अनिल चोपडा, जमाल सय्यद, अशोक प्रधान, प्रफुल्ल पाटील, ॲड. किशोर हजारे, दत्ता ढवळे, आरडीसीसी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, तुकाराम लडगे, शेकाप तालुका महिला आघाडी प्रमुख नागेश्वरी हेमाडे, प्रमोद घासे आदींसह वेगवेगळ्या आघाड्यांचे पदाधिकारी, महिला व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी जयंत पाटील म्हणाले की, शेकापच्या माध्यमातून थळ, नवगाव, वरसोली परिसरात रस्ते, सिमेंट काँक्रिट मार्ग, रिक्षा स्टँडचे रस्ते, बंधारे यांसारखी महत्त्वाची विकासकामे करण्यात आली. मात्र, आम्ही कधीही त्या कामांची जाहिरात केली नाही. वरसोली येथील बंधारा आपण मंजूर केला आहे. मात्र, कधी फलकबाजी केली नाही. परंतु, काम आम्ही करायचे आणि नारळ फोडायला विरोधक पुढे, हा सध्याचा राजकीय प्रकार असल्याची टीका त्यांनी केली. अलिबागची आमदारकी कधी काळी महाराष्ट्राला दिशा देणारी होती. नाना कुंटे, मधुकर ठाकूर यांसारख्या आमदारांनी चारित्र्य, प्रामाणिकपणा आणि लोकहित जपले. त्यांनी कोणाचे पैसे खाल्ले नाहीत, असा टोला शेकाप नेते जयंत पाटील यांनी लगावत अलिबागच्या राजकीय इतिहासाची आठवण करून देते आजच्या सत्ताधाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

पुढे जयंत पाटील म्हणाले की, थळ ग्रामपंचायतीला आरसीएफ कंपनीकडू साडेसात कोटी रुपयांची घरपट्टी मिळते. या व्यवहारांचे स्पेशल ऑडिट झाले तर अनेकांवर गुन्हे दाखल होतील, असा गंभीर आरोप जयंत पाटील यांनी केला.थळ मतदार संघात रस्ते, पाणी, रोजगार, कोळीवाड्यांचे प्रश्न प्रलंबित असताना कोट्यवधी रुपयांचा वापर नेमका कुठे झाला, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. तसेच, सध्या निवडणुकांमध्ये प्रचंड प्रमाणात धनशक्तीचा वापर होत आहे. मात्र, शेतकरी कामगार पक्ष हा जनशक्तीवर विश्वास ठेवणारा पक्ष आहे. सुरेश घरत यांनी गेल्या अनेक वर्षांपासून तालुक्यात प्रभावशाली काम केले आहे. थळ मतदार संघातील वेगवेगळे प्रश्न मार्गी लावले आहेत. किमान वेतन मिळावे, यासाठी त्यांनी प्रयत्न केले आहेत. या मतदार संघात त्यांनी चांगला संपर्क ठेवला आहे. थळ जिल्हा परिषद मतदारसंघ महिला राखीव असून, सुरेश घरत यांनी या भागात अनेक वर्षांपासून केलेल्या जनसंपर्काच्या कामाचा विचार करून त्यांच्या मुलीला संधी देण्याचा निर्णय घेतला आहे. सानिका घरत या उच्चशिक्षित असून, त्या लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. थळ मतदार संघ पुन्हा आपण घेऊ शकतो. त्यापद्धतीने कार्यकर्त्यांनी कामाला लागणे गरजेचे आहे. प्रचारासाठी कमी दिवस आहेत. रात्रीचा दिवस करून प्रत्येकाने मतदारांपर्यंत पोहोचून काम करायचे आहे. सानिका घरत या सुशिक्षित उमेदवार आहेत. आम्ही सुशिक्षित आणि चारित्र्यवान उमेदवारांना संधी देत आहोत. कमी वेळात प्रचार करायचा असून, प्रत्येक कार्यकर्त्याने रात्रंदिवस काम करावे, असे त्यांनी आवाहन केले.

### थळ मतदारसंघात परिवर्तन अटळ:

### चित्रलेखा पाटील

या मतदार संघात चांगले काम करीत आहेत. येथील कामगारांना किमान वेतन मिळावे, येथील पाणी, रस्ता प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी पाठपुरावा केला. कोळीवाड्यातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. या परिसरात त्यांनी प्रचंड काम केले आहे. यावेळी सानिका घरत यांच्या रुपाने सुशिक्षित व सुसंस्कृत उमेदवार शेकापकडून देण्यात आला आहे. यावेळी एक वेगळा इतिहास घडू शकतो, असा विश्वास आहे. त्यामुळे जिल्ह्याबरोबरच राज्याच्या राजकारणात वेगळे नाव होईल, असे चित्रलेखा पाटील म्हणाल्या.

### निवडणुकीत प्रत्येकाचे योगदान मोलाचे :

### ॲड. मानसी म्हात्रे

तसेच, सुरेश घरत यांच्याकडे आव्हान स्वीकारण्याचे वाघाचे काळीज आहे. त्यांच्यासाठी या निवडणुकीचा पेपर अगदी सोपा आहे. सुरेश घरत यांचे काम सगळ्यात जास्त आहे. या मतदार संघात त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. त्यांच्या कार्याची दखल घेत एक नव्या बदलासाठी सुरेश घरत यांची मुलगी सानिका घरत यांची थळ जिल्हा परिषद मतदार संघाच्या उमेदवार म्हणून निवड शेकाप नेते जयंत पाटील यांनी केली आहे. प्रत्येक कार्यकर्त्यांनी या लढतीमध्ये गांभीर्याने बघून योगदान देणे गरजेचे आहे, असे शेकाप राज्य कामगार आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे म्हणाल्या.

### निवडणुकीत चांगले यश येणार: प्रदीप नाईक

आव्हान निर्माण झाले होते. शेकाप तालुका चिटणीस म्हणून सुरेश घरत यांच्यावर एक जबाबदारी सोपविली. त्यांनी एका वर्षात तो विश्वास सार्थक केला. वेगवेगळ्या समित्या गठीत करून कार्यकर्त्यांमध्ये नवचैत्यन निर्माण केले. सध्या धनशक्तीचा प्रचंड वापर केला जात आहे. ही निवडणूक धनशक्ती विरुद्ध जनशक्ती अशी आहे. शेकाप हा एक मजबूत फळी निर्माण करणारा पक्ष आहे. जिल्हा परिषद थळ मतदार संघासाठी सानिका सुरेश घरत यांना उमेदवारी जाहीर केली आहे. एक चांगला उमेदवार पक्षाने दिल्याचे प्रदीप नाईक म्हणाले.

## एच.पी. अधेसिव्हस कंपनीत आग

तोंडली, डोणवत तसेच लहान आदिवासी वाड्यांमधील ग्रामस्थांना धोका निर्माण झाला होता, अशी माहिती ग्रामस्थ यांनी दिली. संभाव्य धोका लक्षात घेऊन प्रशासनाने तत्काळ खबरदारी घेत काही ग्रामस्थांना सुरक्षितस्थळी हलवले.अशी मागणी स्थानिक नेत्यांनी केली. त्यानंतर रविवारी (दि.१८)सकाळी गावातील महिला व तरूण वर्ग कंपनी समोर आक्रमक पवित्रा घेत कंपनी बंद करण्यासाठी आक्रोश केला. यावेळी सरपंच, उपसरपंच यांच्या भूमिके बाबत संताप व्यक्त केला. यावेळी कंपनीच्या मालकिन यांनाही घडलेल्या घटनेबाबत दुख व्यक्त केले. त्यांनी, आम्ही गावकरी व कामगारांसोबत असल्याचे सांगत कंपनीची भूमिका स्पष्ट केली. तसेच, शासनाच्या सर्व परवानग्या घेऊन गेली ४९ वर्षांपासून ही कंपनी सुरू असून पुन्हा सुरू करण्याआधी सर्व परवानग्या घेऊ, असेही त्यांनी सांगितले.

## खासगी वनजागेत टॉवरचे अनधिकृत बांधकाम

राज्य सरकारने महाराष्ट्र शासन खासगी वन अधिनियम १९७५ हा खासगी जंगले, संपादन करण्यासाठी आणि खासगी वन जमिनीसंबंधित इतर बाबींची तरतूद करण्यासाठी हा कायदा केला आहे. परंतु, मुरूड तालुक्यातील राजपुरी येथील खासगी वन जमिनीवर धन दांडग्यांनी अतिक्रमण करून बांधकाम करण्यास सुरुवात केली आहे. या बांधकामाविरोधात मुरूडच्या वन परिक्षेत्र अधिकारी पॉल यांच्याकडे ॲड. शेडगे यांनी लेखी तक्रार केली असून, बांधकामास परवानगी दिली आहे, असा जाब विचारला आहे. मात्र, त्यांच्या म्हणण्यानुसार, वन परिक्षेत्र अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही. वन संरक्षणाचे नियम धाब्यावर बसवून मोबाईल टॉवर उभारले जात आहे. मात्र, वन परिक्षेत्र अधिकारी यांच्याकडून कारवाईबाबत दुर्लक्ष होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. ही कारवाई तातडीने न केल्यास आगरी समाज शेतकरी प्रबोधिनी मार्फत कायदेशीर कारवाईसाठी न्यायालयात दाद मागण्यात येईल, असा इशारा ॲड. शेडगे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

राजपुरी येथील गट नं. १३९/१० अ या महाराष्ट्र शासन खासगी वने असा शेरा असलेल्या जमिनीवर एअर टेल, कंपनीकडून अनधिकृत टॉवरचे बांधकाम सुरु आहे. याबाबत वन परिक्षेत्र अधिकारी मुरूड यांच्याकडे लेखी तक्रार करून कारवाई करण्याची मागणी केली आहे. मात्र, मोबाईल टॉवर अनधिकृत बांधकामाकडे दुर्लक्ष केले जात आहे. खासगी वन जागेत हे बांधकाम असून, त्याला कोणतीही परवानगी नाही. ही कारवाई लवकर झाली नाही, तर न्यायालयात दाद मागणार आहे. असे ॲड. विनायक शेडगे यांनी सांगितले.

## पोलादपूरमध्ये सर्वपक्ष निवडणुकीच्या रिंगणात?

तसेच, जनता दल सेक्युलरचे जिल्हाध्यक्ष यांनीही पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या प्रत्येकी एका सर्वसाधारण जागेवर उमेदवार देण्याची तयार केली असल्याची माहिती दिली. पहिल्या दोन दिवसांमध्ये १६ आणि ३० नामनिर्देशन पत्रांचे वितरण झाल्यानंतर निवडणूक प्रशासनालाही किती पक्ष किती उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे करतील याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## रोह्यातील शेतकऱ्याची 'स्ट्रॉबेरी क्रांती'

उष्ण कटिबंधीय हवामान असूनही ठिबक व स्प्रिंकल सिंचन पद्धतीच्या सहाय्याने त्यांनी सात एकर क्षेत्रात स्ट्रॉबेरीचे भरघोस उत्पादन घेतले आहे. कोणत्याही रासायनिक खतांचा वापर न करता नैसर्गिक व सेंद्रिय खतांवर भर दिल्यामुळे त्यांच्या स्ट्रॉबेरीला चव, दर्जा आणि बाजारात मोठी मागणी आहे. गेल्या दोन महिन्यांतच स्थानिक बाजारपेठेत ६५ ते ८५ हजार रुपयांची विक्री झाली असून, नोव्हेंबर ते डिसेंबर या कालावधीत सरासरी चार पीके घेता येतात. त्यामुळे वर्षभरात लाखो रुपयांचे उत्पन्न सहज शक्य असल्याचे नितीन पाटील सांगतात.

नितीन पाटील यांचा हा प्रयोग रोहा तालुका आणि रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. सेंद्रिय आणि स्मार्ट शेतीकडे वळल्यास शेती केवळ उपजीविकेचे साधन न राहता एक यशस्वी व्यवसाय ठरू शकतो, हे या यशोगाथेने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

## पनवेलच्या भाविकांवर काळाचा घाला

माला रवी साळवे (४०), खांदा वसाहतीतील अर्चना तुकाराम भंडारे (४७), पनवेल रेल्वे वसाहतीतील विशाल नरेंद्र भोसले (४१) व खारघर येथील अमर पाटील आणि आनंद माळी या पाच जणांचा समावेश आहे. तर, जखमी महिलेचे नाव ज्योती जयदास टाकले असून त्या पनवेलमधील रहिवासी आहेत. त्यांना उपचारासाठी तात्काळ मोहोळ ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे.

## ज्येष्ठ नागरिकाची कोट्यवधींची फसवणूक

गैरव्यवहार करण्यात आल्याचे व त्याबाबत त्यांच्यावर नाशिक येथे गुन्हा दाखल झाल्याची सांगून त्यांना घाबरवले. त्यानंतर स्वतः ला नाशिकच्या क्राइम ब्रँचचे एनआयए अधिकारी असल्याचे भासवत वेगवेगळ्या गुन्हेगारांनी त्यांच्याशी संपर्क साधून त्यांना अटकेची भीती घातली. अशा विविध भीती दाखवून त्यांना घाबरविण्यात आले. तसेच, याबाबत कुणाशी चर्चा करू नये, अशी सक्त ताकीद देखील दिली. त्यानंतर सायबर गुन्हेगारांनी आरबीआयने उघडलेल्या विशेष खात्यात सर्व पैसे जमा करण्यास सांगितले. त्यावर निवृत्त संचालकाने नोव्हेंबर ते जानेवारी या कालावधीत वेगवेगळ्या बँक खात्यांवर तब्बल ४ कोटी ३८ लाख रुपये पाठवले. त्यानंतर सायबर गुन्हेगारांनी इतर नागरिकांकडून फसवणूक केलेली १ कोटी २ लाख रुपयांची रक्कम देखील या वृद्धाच्या खात्यात जमा करून ती इतर खात्यांत पाठवायला सांगितली. याप्रकरणी नागपूर सायबर पोलिसांनी डिसेंबरमध्ये या संचालकाचे बँक खाते फ्रीज केल्याचे भासवण्यात आले. त्यानंतर या त्यांनी नागपूर सायबर पोलिसांशी संपर्क साधला असता हा प्रकार सायबर फसवणूक असल्याचे स्पष्ट झाले. त्यावर त्यांनी १० जानेवारी रोजी एनसीसीआरपी पोर्टलवर तक्रार दाखल केली.




# वडेर हायस्कूलचा ऐतिहासिक स्नेहमेळावा

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देणे आणि मित्र-मैत्रिणींच्या सहवासात पुन्हा एकदा बालपण जगणे, हा आनंद काही वेगळाच असतो. असाच एक अनोखा आणि हृदयस्पर्शी स्नेहमेळावा पालीतील ग.बा.वडेर हायस्कूल येथील १९८६ च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी नुकताच साजरा केला. यावेळी जमलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी कृतज्ञता व्यक्त करत सामाजिक बांधिलकीचा वसा घेऊन गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करण्याचा निर्णय घेतला.

या मेळाव्याचे मुख्य आकर्षण म्हणजे या बॅचचे विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत यशाच्या शिखरावर आहेत. मुंबई, पुणे येथूनच नव्हे तर सांगली, मिरज अशा लांबच्या शहरांतूनही मित्र-मैत्रिणी एकत्र आले होते. यामध्ये प्रामुख्याने वकील, इंजिनिअर, शिक्षक आणि उद्योजकांचा समावेश होता. विशेषतः डॉ. हेमंत निकम जे सध्या परदेशातील एका नामांकित कंपनीत उच्च पदावर कार्यरत आहेत, त्यांनी आपल्या यशाचा प्रवास उलगडला आणि उपस्थित मित्रांना मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी केवळ आनंद साजरा न करता सामाजिक बांधिलकी जपण्याचा निर्णय घेण्यात आला. सचिन दाभोळकर यांनी आपल्या मनोगतात स्पष्ट केले की, या मेळाव्याच्या निमित्ताने जमा झालेला निधी गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी खर्च केला जाईल. भविष्यातही सामाजिक कार्यावर भर देण्याचा संकल्प यावेळी सर्व मित्रांनी एकमताने सोडला.



# विवा कॉलेजतर्फे पुरस्काराने सन्मानित

| माणगाव | प्रतिनिधी |

शैक्षणिक क्षेत्रात आग्रगण्य असणाऱ्या माणगाव येथील प्रोफेशनल एज्युकेशन सोसायटीच्या विवा कॉलेजतर्फे 'सह्याद्री २०२६' कार्यक्रमांतर्गत रविवारी (दि.१८) माणगावातील कुणबी भवन हॉलमध्ये विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र साळवी, उद्योजक विजय मेथा, विनया जाधव, विवा कॉलेजच्या चेअरमन विनया ढेपे, प्राचार्य विवेक ढेपे, प्रा. वाघमारे, अनिकेत घोसाळकर व महेश ढेपे आदींच्या हस्ते देण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र साळवी यांनी, विवा कॉलेजने अनेक विद्यार्थी घडविल्याचा रास्त अभिमान वाटत असून हे कॉलेज विविध क्षेत्रात उत्तम कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करते. हि अभिनंदनीय गोष्ट आहे. तसेच, त्यांनी कॉलेजच्या चेअरमन विनया ढेपे, प्राचार्य विवेक ढेपे व त्यांना सहकार्य करणाऱ्या सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे विशेष कौतुक केले. विजय मेथा यांनी आपल्या मार्गदर्शनात बोलताना, विवा कॉलेज गुणवंतांचा पुरस्काराने सन्मान करते हि बाब कौतुकास्पद असल्याचे सांगितले. तसेच, या कॉलेजमध्ये विविध कोर्सेसचे शिक्षण विद्यार्थी घेत असून हे कॉलेज अल्पावधीत नावारूपाला येईल, असे सांगून प्राचार्य विवेक ढेपे व सहकारी यांना शुभेच्छा दिल्या.

## निवडक



### शेतकरी मेळावा उत्साहात

**माणगाव :** किसान क्रांती संघटना महाराष्ट्र राज्य माणगाव तालुका कार्यकारिणीच्यावतीने आयोजित जिल्हास्तरीय शेतकरी मेळावा व मधुमक्षिका पालन प्रशिक्षण माणगाव येथे शुक्रवारी (दि.१६) संघटनेचे राज्याचे अध्यक्ष टि.एस. देशमुख,कृषी विज्ञान केंद्र किल्ला रोहा डॉ.जीवन आरेकर, उपविभागीय कृषी अधिकारी शुभम बोराडे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात संपन्न झाले. या जिल्हास्तरीय शेतकरी मेळाव्यात डॉ.जीवन आरेकर यांनी मधमाशी पालनावर मौलिक असे मार्गदर्शन केले. तसेच उपविभागीय कृषी अधिकारी शुभम बोराडे यांनी या मेळाव्यात शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती दिली. जिल्हाध्यक्ष भरत राणे यांनी संघटना बांधणीबाबत मार्गदर्शन केले. या मेळावा व प्रशिक्षण कार्यक्रमास संघटनेचे उपाध्यक्ष श्रीधर जंजीरकर, शास्त्रज्ञ डॉ.मांजरेकर, तालुका कृषी अधिकारी आर.एस. कावळे, विस्तार अधिकारी अशोक मार्कंड, महाड अध्यक्ष योगेश साळुंके, मागणाव अध्यक्ष रघुनाथ गोसावी, राज्य संघटक विनायक देशमुख, सुरेश म्हस्के, कृषी सहाय्यक जयदीप थरकर, महीपत मांजरे, बाबू पालकर, बापू बक्कम, संतोष शिंदे, भगवान शिंदे, अजित तोंडलेकर, भास्कर गावडे आदी उपस्थित होते.



### हळदीकुंकू समारंभातून हिंदु जनजागृती

**रसायनी :** रसायनी परिसरातील सर्वाधिक सदस्य संख्या असलेला मोहोपाडा येथील वासांबे आई महिला बचत गटाचा हळदी कुंकू समारंभ मोठ्या उत्साहात व थाटामाटात ग्रामपंचायत सदस्या रसिका राकेश खराडे यांच्या आवारात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात हिंदू सण, हिंदू संस्कृती, लव जिहाद, महिलांवरील अत्याचार, महिला एकजुटीकरण, नाम साधना या विविध विषयावर महिलांना मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाकरिता वासांबे रसायनी महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या. या हळदीकुंकू समारंभाचा ५२३ महिलांनी लाभ घेतला. यावेळी मोहोपाडा वासांबे आई महिला बचत गटाच्या महिलांनी पारंपारिक नाच करुन कार्यक्रम साजरा केला. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोहोपाडा येथील वासांबे आई महिला बचत गटाच्या महिलांनी अथक परिश्रम घेतले.



### विवा कॉलेजमध्ये रंगला पुरस्कार सोहळा

**माणगाव :** शैक्षणिक क्षेत्रात आग्रगण्य असणाऱ्या माणगाव येथील प्रोफेशनल एज्युकेशन सोसायटीच्या विवा कॉलेजतर्फे सह्याद्री २०२६ कार्यक्रमांतर्गत विविध क्षेत्रातील मान्यवरांना सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र साळवी, प्रसिद्ध उद्योजक विजय मेथा, आदर्श शिक्षिका विनया जाधव, विवा कॉलेजच्या चेअरमन विनया ढेपे, प्राचार्य विवेक ढेपे, प्रा.वाघमारे, अनिकेत घोसाळकर, महेश ढेपे आदींच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र साळवी यांनी विवा कॉलेजने अनेक विद्यार्थी घडविल्याचा रास्त अभिमान वाटत असून हे कॉलेज विविध क्षेत्रात उत्तम कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करते हि देखील अभिनंदनीय गोष्ट आहे असे सांगत त्यांनी कॉलेजच्या चेअरमन विनया ढेपे, प्राचार्य विवेक ढेपे व त्यांना सहकार्य करणाऱ्या सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे विशेष कौतुक केले. प्रसिद्ध उद्योजक विजय मेथा यांनी आपल्या मार्गदर्शनात बोलताना विवा कॉलेज गुणवंतांचा पुरस्काराने सन्मान करते हि बाब कौतुकास्पद असल्याचे सांगत या कॉलेजमध्ये विविध कोर्सेसचे शिक्षण विद्यार्थी घेत असून हे कॉलेज अल्पावधीत नावारूपाला येईल असे सांगून प्राचार्य विवेक ढेपे व सहकारी यांना शुभेच्छा दिल्या. विवा कॉलेज माणगावमध्ये तज्ञ शिक्षकांकडून विविध कोर्सेस शिकविले जात असून जवळपास ३७०हुन अधिक विद्यार्थी या कॉलेजमध्ये विविध कोर्सेसचे शिक्षण घेत आहेत.



# थंडीमुळे कलमांवर मोहोर बहरला

## श्रीवर्धनमधील बागायतदार सुखावले; कीडनियंत्रणासाठी औषध फवारणी सुरू

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानात लक्षणीय घट झाल्याने हापूस आंबा कलमांवर मोहोर येण्यास पोषक वातावरण निर्माण झाले आहे.

सकाळ-संध्याकाळ जाणवणारी थंडी आणि कोरडे हवामान यामुळे बहुतांश भागात आंब्याच्या कलमांवर मोहोर बहारू लागल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे आंबा बागायतदारांमध्ये समाधानाचे वातावरण असून यंदाचा हंगाम चांगला जाईल, अशी आशा पल्लवित झाली आहे.

यावर्षी सुरुवातीला काही भागांत ढगाळ हवामान आणि तुरळक अवकाळीमुळे आंबा कलमांवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र त्यानंतर आलेल्या थंड व कोरड्या हवामानामुळे मोहोर येण्याची प्रक्रिया वेगाने सुरू झाली आहे.

कमी आर्द्रता आणि थंड वारे यामुळे मोहोर धरायला अनुकूल स्थिती निर्माण झाली आहे. श्रीवर्धन, हरिहरेश्वर, दिवेआगर, कार्ले, नागलोली तसेच वडवली, वेळास आणि दिघी परिसरातील अनेक बागांमध्ये हापूस आंब्याच्या कलमांवर मोहोर स्पष्टपणे दिसू लागली आहे.

काही ठिकाणी मोहोर दाट असून उत्पादनाच्या दृष्टीने ही स्थिती उत्साहवर्धक मानली जात आहे. गेल्या काही वर्षांत बदलत्या हवामानाचा फटका बसल्याने आंबा उत्पादनात चढ-उतार पाहायला मिळत होते.

मात्र यंदा डिसेंबरअखेर व जानेवारीच्या सुरुवातीला थंडी वाढल्याने योग्य वेळी मोहोर येत असल्याचे बागायतदारांचे म्हणणे आहे. हवामान अनुकूल राहिल्यास येत्या काही आठवड्यांत श्रीवर्धन तालुक्यातून यंदा मुबलक हापूस आंबा बाजारात येईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

### औषध फवारणीला सुरुवात

मोहोर फुटल्यानंतर तुडतुडा, थ्रिप्स तसेच इतर किडींचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन बागायतदारांनी प्रतिबंधात्मक औषध फवारणीला सुरुवात केली आहे. खर्चात वाढ होत असली तरी मोहोर सुरक्षित ठेवणे अत्यावश्यक असल्याचे बागायतदार सांगत आहेत. कृषी तज्ज्ञांच्या मते, पुढील काही दिवस थंडी कायम राहिली आणि अचानक पाऊस किंवा ढगाळ वातावरण झाले नाही, तर मोहोर टिकून राहून फलधारणेला मदत होईल. मात्र तापमानात अचानक वाढ किंवा अवकाळी पावसामुळे मोहोर गळण्याची शक्यता असल्याने बागायतदारांनी वेळेवर कीडनियंत्रण व बागेची योग्य निगा राखावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

## कार्यकर्त्यांच्या निकृष्ट दर्जाच्या विकास कामांमुळे पक्ष अडचणीत?

**| तळा | प्रतिनिधी |**



तळा तालुक्यात राजकीय पक्ष स्वतःच्या कार्यकर्त्यांच्या निकृष्ट दर्जाच्या विकासकामामुळे संकटात सापडला आहे. गावोगावातील विकास कामांमध्ये झालेल्या निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे पक्षावर जनतेचा राग जोर धरत आहे.

जलजीवन पाणीपुरवठा योजना, रस्ते, गटारे, सामाजिक सभागृह आणि इतर गावपातळीवर होणाऱ्या कामांमध्ये मनमानी निकृष्ट साहित्य वापरल्याचा आणि कामे अर्धवट राहिली असल्याचा आरोप वाढत आहे.

स्थानिक ग्रामस्थ यांनी म्हटले आहे की, ठेकेदाराला राजकीय संरक्षण मिळत असल्याने कारवाई होत नाही, पक्षाचा कार्यकर्ता असल्यामुळेच निकृष्ट कामे असूनही त्याकडे डोळेझाक केली जात आहे,फ आज गावोगावी विकासकामांची बिकट अवस्था झाली आहे. नागरिकांना मुबलक पाणी मिळावे यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने जलजीवन योजनेतून करोडो रुपये खर्च करण्यात आले. फिल्टर आणि सोलर पॅनल जोडण्यात आलेले असताना नागरिकांना अशुद्ध पाणी प्यावे लागत आहे. हजारो रुपयांचे विजेचे बिल भरावे लागत आहे तरीही पक्षांचे सब ठेकदार ग्रामस्थांना दबावात घेत आहेत त्यामुळे पक्षाची प्रतिमा ग्रामस्थांमध्ये बिघडली आहे. याबाबतीत अनेक तक्रारी आमसभा, आढावा बैठकीत करण्यात आल्या परंतु ठेकेदार किंवा सब ठेकेदार हा पक्षाचा कार्यकर्ता असल्याने त्याला पाठीशी घालण्याचे काम लोकप्रतिनिधी करत आहेत ग्राम स्थ आणि नागरिकांना याबाबतीत मोठ्या प्रमाणावर असंतोष असून जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत राजकीय पक्ष अडचणीत येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## परदेशी नागरिकांचे बेकायदा वास्तव्य चार घरमालकांविरुध्द गुन्हा

**| पनवेल | वार्ताहर |**

गुन्हे शाखेच्या पथकाने नुकतीच तळोजा आणि खारघर परिसरात छापे टाकून परदेशी नागरिकांना सी-फॉर्म न भरता बेकायदेशीरपणे घरे भाड्याने देणाऱ्या ४ घरमालकांवर गुन्हे दाखल केले आहेत.

नवी मुंबई पोलीस आयुक्तांच्या आदेशानुसार आफ्रिकन नागरिक राहत असलेल्या कोपरखैरणे, वाशी, खारघर आणि तळोजा परिसरात छापे टाकण्यात आले. या कारवाईत खारघर तळोजा परिसरातील ४ घरम ालकांनी परदेशी नागरिकांना सी-फॉर्म न भरता बेकायदेशीररित्या आपल्या घरामध्ये भाडोत्री म्हणून ठेवल्याचे आढळून आले. तळोजा येथील पार्वती हाईटस, रूम नं. ५०१ येथे परदेशी नागरिकांना बेकायदेशीरपणे राहण्यास मदत केल्याप्रकरणी घरमालक शारंगधर पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खारघर येथील ड्रिम सफायर इमारतीम धील फ्लॅट क्रमांक ४०१ आणि ४०२ तसेच सेक्टर-३०, ओवे गाव येथील गॉडगिफ्ट को-ऑप. हौसिंग सोसायटीतील फ्लॅट क्रमांक ३०४ येथे परदेशी नागरिकांना बेकायदेशीररित्या घरे भाड्याने दिल्याप्रकरणी घरमालक यासीर जेठवा, शमा खान आणि श्वेता नाईक यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या सर्व घरमालकांविरोधात तळोजा आणि खारघर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईत बेकायदेशीररित्या वास्तव्यास असलेल्या आफ्रिकन नागरिकांना ताब्यात घेण्यात आले आहे. परदेशी नागरिकांना भाड्याने घर देताना सी-फॉर्म भरणे बंधनकारक असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

# शेलघर येथे कॉँग्रेसची आढावा बैठक

**| चिरनेर | प्रतिनिधी |**



जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये तरुणांना संधी दिली जाईल. कॉंग्रेस पक्ष चांगले तगडे व अभ्यासू उमेदवार उभा करेल. विशेषता: महाविकास आघाडीच्या माध्यमातून या निवडणुका लढविल्या जातील. महापालिका व नगरपालिकेच्या निवडणुकीत कॉंग्रेसला चांगले यश प्राप्त झाले आहे. त्यामुळे ही निवडणुक कार्यकर्त्यांनी ताकतीनशी लढवावी असे आवाहन करत, या निवडणुकीत रायगडमध्ये कॉंग्रेसला चांगले यश मिळेल. असा विश्वासही कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी व्यक्त केला.

शनिवारी (दि.१७) कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांची विशेष आढावा बैठक शेलघर पार पडली. त्यावेळी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत हे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी संभाव्य उमेदवारांची चाचपणी करण्यात आली.

यापुढे महेंद्र घरत यांनी शक्य तिथे कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेऊन स्वबळावर उमेदवार उभे केले जातील. त्यामुळे निश्चितच रायगडमध्ये कॉंग्रेसला चांगले यश मिळेल. कार्यकर्त्यांनी सकारात्मक विचार करावा असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी राणीताई अग्रवाल यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना कॉंग्रेस फक्त पक्ष नाही तर विचारधारा आहे. ती संपणार नाही. कार्यकर्त्यां मध्ये उत्साह आहे. महेंद्र घरत हे जिंदादिल आहेत. त्यांनी कार्यकर्त्यांना बळ दिले आहे. निष्ठावंत कार्यकर्त्यांचाच निवडणुकीसाठी विचार व्हावा, बाहेरून ऐनवेळी कॉंग्रेसमध्ये आलेल्यांना तिकीट मिळणार नाही. यावेळी अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी आपापल्या भावना व्यक्त केल्या.

यावेळी रायगडच्या प्रभारी राणी अग्रवाल, निरीक्षक मनीष गणोरे, सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, नंदराज मुंगाजी, मनीष पाटील, वसंत काठावले, हेमराज म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी महेंद्र घरत यांनी जे कॉंग्रेसमध्ये आहेत त्या सर्वांचे अभिनंदन! आपण जिंकू शकतो, अशक्य काहीच नाही, अंतुले साहेबांचा बालेकिल्ला आहे. कार्यकर्त्यांच्या, पदाधिकाऱ्यांच्या भावनांचा निश्चितच आदर केला जाईल. त्यांना विश्वासात घेऊनच आपण निवडणुका लढवू. तालुक्यात स्वबळावर लढण्याची परिस्थिती असेल तर त्या पदाधिकाऱ्यांना स्वातंत्र्य दिले जाईल. त्यामुळे मनात आणले तर आपण निश्चितच चांगल्या जागा जिंकू शकतो. यावेळी राजाभाऊ ठाकूर यांनी जनादेश आहे, त्यांना एबी फार्म द्या, हा जिल्हा कॉंग्रेसचा आहे. महेंद्र घरत पॉवरबाज आहेत, ते काहीही करू शकतात. ज्या जागा लढवू त्या जिंकणारच, असे सांगितले.

# उमेदवारीसाठी धुरंधर डावपेच

**| तळा | प्रतिनिधी |**



जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक अर्ज भरण्यापूर्वी तालुक्यातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. उमेदवारी मिळवण्यासाठी कार्यकर्त्यांनी आपले खेळ सुरू केले असून उमेदवाराच्या गुणवत्तेपेक्षा तो कोणत्या जातीचा आहे या पातळीवरील स्पर्धेने अधिक, जोर धरला आहे. आपल्या जातीच्या कार्यकर्त्याला उमेदवारी मिळविण्यासाठी इच्छुक कार्यकर्त्यांचे डावपेच उघडपणे सुरू झाले आहेत. यामध्ये विविध पक्षांतील स्थानिक नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते सक्रिय झाले असून पक्षश्रेष्ठींच्या भेटीगाठी, शक्तीप्रदर्शन आणि संघटनात्मक हालचालींना वेग आला आहे. यामध्ये सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते आघाडीवर असून शिवसेना शिंदे गट आणि भाजपा या सर्व घडामोडींवर बारीक लक्ष ठेवून आहेत.

सध्या सुरू असलेल्या उम ेदवारी लढाईत राजकीय पक्षांतील कार्यकर्त्यांनी आपापल्या पारंपारिक गटांचे समर्थन मिळवण्यासाठी आक्रमकपणे एकमेकांना टाकलेली चाल खूपच चर्चेत आहे. गटबाजीच्या आणि जातीच्या आधारावर उम ेदवारांची निवड होत आहे, ज्यामुळे उमेदवाराच्या गुणवत्तेला हद्दपार केले गेले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या या बालेकिल्ल्यातउमेदवारीवरूनखलबत सुरू असून अजूनही कोणालाही उमेदवारी जाहीर करण्यात आलेली नाही परंतु आपल्याच जातीच्या कार्यकर्त्याला उमेदवारी मिळावी याकरिता ताकद दाखवण्यासाठी काही इच्छुकांनी समर्थकांचा मोठा लवाजमा गोळा करून वरिष्ठ नेत्यांपुढे हजेरी लावण्यास सुरुवात केली आहे. तर काहीजण शांत राहून घडामोडींवर लक्ष ठेवून आहेत. त्यामुळे जातीच्या राजकारणात पक्षांतर्गत गटबाजी पुन्हा एकदा उफाळून येण्याची चिन्हे दिसत असून आपलाच उमेदवार कसा योग्य हे सिद्ध करण्यासाठी अंतर्गत राजकारण रंगात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने मात्र मागील निवडणुकांतील कामगिरी, वैयक्तिक संपर्क, आर्थिक क्षमता आणि स्थानिक प्रभाव या मुद्द्यांवर उमेदवारी ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.निवडणुकीत जातीचे राजकारण उफाळून आल्यामुळे उमेदवारांची घोषणा करण्यात आलेली नाही त्याचबरोबर एखाद्या नव्या चेहऱ्यांना संधी दिल्यास जुन्या पदाधिकाऱ्यांमध्ये अस्वस्थता पसरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## भातखरेदीला प्रतिसाद

**| पनवेल | वार्ताहर |**

पनवेल तालुक्यात आधारभूत धान खरेदी योजना २०२५२६ अंतर्गत धान खरेदीला वेग आला आहे. महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन, मुंबई व जिल्हा पणन अधिकारी कार्यालय यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वसाधारण धानासाठी प्रति क्विंटल २,३६९ रुपये दर जाहीर करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत पनवेल तालुक्यातील शेतकरी ऑनलाईन नोंदणी करून आपला भात पनवेल तालुका सहकारी भात गिरणी लिमिटेड येथे विक्रीसाठी आणत आहेत. दर समाधानकारक असल्याने शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून गिरणी परिसरात मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. शासनाच्या हमीभाव खरेदीमुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून धान खरेदी प्रक्रिया सुरळीतपणे सुरू आहे.

## कुणबी समाज तळवडे विभागाने संपन्न केले रक्तदान शिबीर



**| म्हसळा | प्रतिनिधी |**

तळवडे विभागीय युवक मंडळाच्या वतीने श्रीकृष्ण हॉल, बोरिवली येथे विभागीय राकेश पेंढारी यांच्या अध्यक्षतेखाली भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन घेण्यात आले होते. तळवडे विभागातील १० गावातून जवळपास १२० पेक्षा जास्त रक्तदात्यांनी रक्तदान करून या कार्यक्रमाला यशस्वी केले आहे.

या सर्वांच्या सहकार्याने पार पाडला. आपले रक्तदान हे कोणाला तरी जीवनदान देऊ शकते ह्याच महत्वकांशी वाक्याला आपल्या सर्वांचा चांगला प्रतिसाद लाभला तालुका कुणबी समाज यांच्या मार्गदर्शनाखाली तळवडे विभाग यांच्या नियोजनात विभाग कमिटी अध्यक्ष राकेश पेंढारी, सचिव सतिश पाटील, खजिनदार दिनेश शिगवण, क्रीडा समिती अध्यक्ष प्रफुल धाडवे, सचिव योगेश पागड, खजिनदार अमित पिचुर्ले, महिला मंडळ अध्यक्षा करुणा काप, सचिव अनिषा डिंगणकर, खजिनदार सोनाली शिर्के, युवक मंडल अध्यक्ष विश्वास गायकर, उपाध्यक्ष चेतन चव्हाण, उपाध्यक्ष अजित पाखड, ओंकार धाडवे, सहसचिव अरुण उंडरे, पंकज तांबिडकर, खजिनदार किरण पवार, सहखजिनदार निलेश कदम, कल्पेश लाड, हिशोब तपासणीअमित शिगवण व यांच्या सर्व सहकार्याने हे रक्तदान शिबिराचे आयोजन करुण यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी राजू धाडवे, महेश शिर्के, अनिल बांद्रे, रुपेश भोगळ, कल्पेश जाधव, स्नेहा खापरे, दर्पना कासरुंग, प्रविण भोगळ, विजय बोर्ले, बबन मनवे, उमेश पोटले, मनोज काप यांनी सहकार्य केले आहे.

**Hiring Walk In Interview**

Company name:- InvoSolar Energy Pvt Ltd
Designation:- Sales Executive
Product:- Solar Panel
Location:- Alibag
Gender:- Male / Female
Equipment needed:- Two Wheeler and Mobile
Qualification:- 12th pass
Petrol allowance:- 5k
Fixed Salary:- 15k
Experience:- 1 year in corporate Sales.

Contact : Mejanoor Shaikh - 8268696332
Nikhil chavan - 9881401550

Send your CV
at:-shaikhmejanoor007@gmail.com

ADDRESS:-SUKHSAGAR BHAVAN, 2ND FLOOR, OPPOSITE AMBEDKAR STATUE, ALIBAG, RAIGAD - 402201

**गॅस सिलिंडर परवडेना | ग्रामीण भागात लाकूडफाटा जमवण्याची धावपळ**

# उज्ज्वलांना पुन्हा चुलीचा आधार

**| रायगड | प्रतिनिधी |**

आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबातील महिलांना चुलीतील धुरापासून मुक्ती मिळावी, महिलांचे आरोग्य सुधारावे आणि पर्यावरण संरक्षणाला हातभार लागावा, या उद्देशाने केंद्र सरकारने २०१६ मध्ये प्रधानमंत्री उज्ज्वला गॅस योजना सुरू केली होती. या योजनेमुळे ग्रामीण व दुर्गम भागात स्वयंपाकासाठी गॅसचा वापर वाढला. काही वर्षांपूर्वी तीन मोफत गॅस सिलिंडर देण्याची योजनाही राबवण्यात आली होती. मात्र सध्या या सवलती बंद झाल्याने आणि घरगुती गॅसच्या किमती सातत्याने वाढत असल्याने उज्ज्वला लाभार्थ्यांना पुन्हा चुलीचा आधार घ्यावा लागत असल्याचे चित्र रायगड जिल्ह्यात दिसून येत आहे.

ग्रामीणभागातीलअनेकघरांमध्ये गॅस शेगडी व सिलिंडर उपलब्ध असले तरी रिफिलिंगचा खर्च परवडत नसल्याने सिलिंडर रिकामेच पडून आहेत. परिणामी महिलांनी पुन्हा चुलीवर स्वयंपाक करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे लाकूडफाटा जमवण्यासाठी गावोगावी महिलांची भल्या पहाटे जंगलात धावपळ सुरू आहे. हा लाकूडफाटा सरपण म्हणून साठवून ठेवला जात असून त्यामुळे वनसंपदेवरही ताण येत आहे. वृक्षतोड कमी व्हावी, इंधनासाठी जंगलांवरील अवलंबित्व घटावे आणि महिलांना धुरामुळे होणाऱ्या श्वसनविकारांपासून संरक्षण मिळावे, या हेतूने उज्ज्वला योजना प्रभावीपणे राबवण्यात आली होती.

रायगड जिल्ह्यात या योजनेला मोठा प्रतिसाद मिळाला. प्रारंभी कोणतेही शुल्क न आकारता गॅस शेगडी व सिलिंडर वितरित करण्यात आले. मात्र त्यानंतर प्रत्येक रिफिलिंगसाठी बाजारभावानुसार पैसे भरावे लागल्याने गरीब कुटुंबांवरील आर्थिक ताण वाढला. महागाईच्या झळांमुळे अनेक महिलांनी गॅसचा वापर मर्यादित केला असून चुलीवरच स्वयंपाक करणे त्यांना भाग पडत आहे. तज्ज्ञांच्या मते, या परिस्थितीचा थेट परिणाम महिलांच्या आरोग्यावर आणि पर्यावरणावर होत आहे. त्यामुळे उज्ज्वला लाभार्थ्यांसाठी पुन्हा सवलती, अनुदान किंवा मोफत अल्पदरातील सिलिंडर योजना सुरू करण्याची गरज व्यक्त होत आहे.

### उज्जला योजनेंतर्गत गॅस जोडण्या

| अलिबाग | म्हसळा | पोलादपुर |
|---|---|---|
| 5078 | 4521 | 787 |
| **कर्जत** | **मुरुड** | **रोहा** |
| 10460 | 1161 | 5498 |
| **खालापूर** | **सुधागड** | **श्रीवर्धन** |
| 8628 | 1915 | 4736 |
| **महाड** | **पनवेल** | **तळा** |
| 6153 | 3947 | 1385 |
| **माणगाव** | **पेण** | **उरण** |
| 3475 | 10293 | 1844 |
| | | एकूण 69881 |




### ६३ हजार ७८४ गॅस जोडणी

रायगड जिल्हा उज्ज्वला गॅस कनेक्शन देण्यात राज्यात अव्वल ठरला होता. कमी कागदपत्रांत मोफत शेगडी व गॅस सिलिंडर मिळत असल्याने पहिल्या दोन वर्षांत मागणीत मोठी वाढ झाली. प्रत्येक गृहिणीला घरात गॅस कनेक्शन असावे, या अपेक्षेतून जिल्ह्यात आतापर्यंत ६३ हजार ७८४ उज्ज्वला गॅस कनेक्शन वितरित करण्यात आले आहेत.

# खरी लढाई आता सुरू

महापालिका निवडणुकांमध्ये भाजप आणि युतीला चांगले यश मिळाले आहे. पण हे यश काय लायकीचे आहे हे लगेच दिसून येऊ लागले आहे. मुंबईत महापौर कोणाचा यावरून ताणाताणी सुरु झाली आहे. खरी शिवसेना आमचीच असा दावा करणाऱ्या शिंद्यांना मुंबईत जबर तडाखा बसला. २२७ मध्ये त्यांना जेमतेम तेरा टक्के जागा मिळाल्या. ज्या ठाकऱ्यांशी त्यांचे भांडण होते त्यांना ३२ टक्के जागा मिळाल्या. तरीही महापौरपद आपल्यालाच मिळायला हवे असा दबाव टाकणे शिंद्यांनी सुरु केले आहे. दुसरीकडे आपला मित्र असलेल्या भाजपची त्यांना इतकी भीती वाटते की आपल्या सर्व नगरसेवकांनी त्यांनी पंचतारांकित हॉटेलात नेऊन ठेवले आहे. म्हणजे भाजप आपल्याच नगरसेवकांना फोडेल असे बहुदा त्यांना वाटते. यातून भाजपची प्रतिमा कशी बकासुरी आहे तेही कळून येते. दुसरीकडे पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये आम्हीच दादा असे मुख्यमंत्र्यांनी अजितदादांना सुनावले आहे. इतर पक्षातून आयात केलेल्यांना केवळ दहा टक्के उमेदवारी दिली गेली असा दावाही फडणवीसांनी केला. एकतर ही टक्केवारी खरोखर दहाच आहे की अधिक आहे हे तपासायला हवे. मुंबई, कल्याण किंवा पिंपरी चिंचवडमध्ये तपास केला तर कदाचित ४० ते ५० टक्के लोक आयात असल्याचे दिसेल. संख्येचा मुद्दा बाजूला ठेवला तरी, या आयातांमुळेच भाजपला हा विजय मिळवता येणे शक्य झाले हे फडणवीस अप्रत्यक्षपणे मान्य करतात असा त्याचा अर्थ होतो. फडणवीसांनी पुण्यात नव्या नगरसेवकांसमोर भाषण करताना, महापालिका म्हणजे कमिशनचा धंदा नव्हे असा दम भरला. याचा अर्थ आपले नगरसेवक काय दर्जाचे आहेत व ते काय करतात याची फडणवीसांना कल्पना आहे. किंबहुना, भाजप ज्या विकासाविषयी बोलत असतो त्यात कंत्राटदार म्हणून याच उपद्व्यापी नगरसेवकांचा मोठा सहभाग असतो हे उघड गुपित आहे. जे पुण्यात तेच इतरत्रही खरे आहे. जालन्यामध्ये तर पत्रकार गौरी लंकेश यांच्या खुनाचा आरोप असलेला उमेदवार निवडून आला आहे. जळगावात बोगस कॉल सेंटर चालवण्याचा आरोप असलेला तुरुंगातून निवडून आला आहे. तर पुण्यात गुन्हेगार टोळ्यांशी संबंधित कुटुंबातील महिला निवडून गेल्या आहेत. थोडक्यात महायुतीच्या यशातले खरे भागीदार काय दर्जाचे आहेत हे कळून यावे.

### जाहिरातीमागची खरी कहाणी

मतमोजणीच्या दिवशी भाजपचा प्रचंड विजय झाला असा शंखनाद करण्यात आला. प्रत्यक्षात मुंबईत भाजपच्या जागा २०१७ च्या ८२ वरून यंदा केवळ ८९ वर गेल्या. म्हणजे सातने वाढल्या. ठाकरे सेनेमध्ये शेवटपर्यंत फोडाफोडी करून, त्यातल्या एका गटाला म्हणजे शिंदे सेनेला बरोबर घेऊन आणि प्रचंड पैसा ओतूनही भाजप शंभर तर सोडाच, ९० च्याही पलिकडे जाऊ शकला नाही. हा काही महाविजय म्हणता येणार नाही. नागपूर, पुणे, पिंपरी चिंचवड इत्यादी ठिकाणी भाजपला नक्कीच प्रचंड विजय मिळाला. जळगावमध्ये तर लढवलेल्या सर्व ४६ जागा भाजपने जिंकल्या. पण नाशिकमध्ये गिरीश महाजनांनी इतक्या फोडाफोडी करूनही १२२ पैकी ७२ च जागा भाजपला मिळाल्या. नांदेडमध्ये मिळालेले यश हे निव्वळ अशोक चव्हाणांच्या जिवावर मिळाले. वसई विरारमध्ये रवींद्र चव्हाणांनी इतकी माणसे फोडूनही हितेंद्र ठाकुरांच्या बहुजन विकास आघाडीचा मोठा विजय झाला. विदर्भात अमरावतीमध्ये मोठी पीछेहाट झाली. तिथे पक्षाच्या माजी खासदार नवनीत राणा यांचे पती वेगळी संघटना करून लढले आणि त्यांनी भाजपच्या पायात पाय घातला. अहिल्यानगरमध्ये अजितदादांचा पक्ष भाजपपेक्षा मोठा ठरला. इचलकरंजी, कोल्हापूर, सांगली या पट्ट्यात भाजप वाढत चालला आहे हे मात्र खरे. पण या बहुतांश ठिकाणी भाजपची सर्व भिस्त काँग्रेस, राष्ट्रवादी व शिवसेनेतून आयात केलेल्यांवर आहे. दुसरीकडे अनेक ठिकाणी भाजपने स्पष्टपणे शिंदे गटाला संपवण्याचा प्रयत्न केला. नवी मुंबई, उल्हासनगर आणि संभाजीनगर ही त्याची ठळक उदाहरणे. तिथे एकमेकांवर भ्रष्टाचारापासून गुंडगिरीपर्यंत सर्व प्रकारचे आरोप केल्यानंतर आता हे पक्ष सत्तेसाठी पुन्हा गळ्यात गळे घालणार आहेत. निवडणूक संपली, शत्रुत्व संपले असे फडणवीस म्हणत आहेत. म्हणजे हा सर्व जनतेला उल्लू बनवण्याचा धंदा होता. आता ज्यांच्यावर आरोप केले त्यांनाच मांडीवर घेऊन किंवा त्यांनाच खांद्यावर घेऊन हे लोक सत्ता ओरपून खाणार आहेत असा त्याचा अर्थ आहे.

### भाजप विरुद्ध शिंदे

आता पुढचे काही दिवस महापौर व इतर पदांसाठी लुटूपुटूच्या लढाया होतील. माध्यमे त्यांच्या बातम्या चालवून वेळ काढतील. मग जिल्हा परिषदांचा प्रचार सुरू होईल. तिथे पुन्हा खोट्या खोट्या लढाया केल्या जातील. पुन्हा निकालानंतर सगळे एकत्र येतील. अर्थात हे सगळे खरे असले तरी भाजप आणि इतर दोन मित्र यांच्या संबंधांमध्ये आता बदल होणे अटळ आहे. आजवर मुंबई पालिका जिंकण्याच्या इर्ष्येपायी भाजपने शिंद्यांचे सगळे हट्ट पुरवले. आता ते घडणार नाही. कल्याण किंवा उल्हासनगरमध्ये भाजप व शिंदे सेना समसमान आहेत. तिथे सत्ता मिळवण्यासाठी भाजपवाले चांगलेच ताणून धरतील. खुद्द मुंबईत शिंदे सेनेला जागा दाखवून देण्याची संधी सोडली जाणार नाही. उद्याला तडजोड म्हणून मुंबईच्या महापौरपदी शिंदे सेनेच्या माणसाला बसवले तरी तो शोभेचा बाहुला राहील याची काळजी घेतली जाईल. आयुक्तच असा नेमला जाईल की तो महापौरांना हलू देणार नाही. शिवाय थेट फडणवीसांचे नियंत्रण राहीलच. दुसरीकडे दादांचे युतीतले महत्व व उपयुक्तता संपल्यात जमा आहे. दादा आणि शरद पवार एकत्र लढल्याने भाजपच्या मतदारांमध्ये नाराजी आहेच. जिल्हा परिषदांमध्ये याचीच पुनरावृत्ती होण्याची शक्यता आहे. काल बारामतीत शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी तर युतीची घोषणाही करून टाकली आहे. पश्चिम महाराष्ट्रात दादांना नगरपालिका आणि आता महानगरपालिकांमध्ये फार उजेड पाडता आलेला नाही. त्या मानाने शिंदे यांची स्थिती बरी आहे. नाशिकमध्ये शिंद्यांना २६ तर दादांना ४ जागा मिळाल्या. शिंदे यांना संभाजीनगरमध्ये १३, भिवंडीतही १२, जालन्यात १२ जागा मिळाल्या तर दादांना या सर्व ठिकाणी शून्य जागा मिळाल्या. अगदी कोल्हापुरातही शिंद्यांना १५ तर दादांना अवघ्या ४ जागा मिळाल्या. जळगाव हा एकेकाळी शरद पवारांचा गड होता. तिथे दोन्ही राष्ट्रवादींना शून्य तर शिंदे यांना तब्बल २२ जागा मिळाल्या. भाजप व शिंदे यापैकी काही ठिकाणी एकत्र तर काही ठिकाणी विरोधात लढले आहेत. शिंदे यांना एकुणात राज्यात क्रमांक दोनच्या जागा मिळाल्या आहेत. याचा अर्थ पुढच्या टप्प्यात भाजपचे खरे सावज हे शिंदे गट हेच असणार आहे. या गटाची रसद तोडून होता होईल तो शिंदे गटाला खच्ची करणे हेच भाजपचे ध्येय राहणार आहे. शत्रुत्व संपले असे फडणवीस म्हणाले असले तरी आता कुठे ते सुरु होणार आहे. खरी लढाई आता दिसेल.

## विचार

# भारताचे 'बाहुबली' यश

***नुकतेच 'इस्रो'चे प्रचंड क्षमतेचे 'बाहुबली' रॉकेट प्रक्षेपित करुन देशाने आत्मनिर्भरतेच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले. या प्रक्षेपणाचे लाभ अनेक क्षेत्रांना होणार असून 'डायरेक्ट-टू-स्मार्टफोन' ही नवी तंत्रज्ञान प्रणाली कार्यान्वित झाल्यामुळे देश प्रगतीपथावरुन वेगाने वाटचाल करु शकणार आहे. शिक्षण, आरोग्य, शेती, व्यापार आदी क्षेत्रांना विनाखंडित इंटरनेट मिळण्याचे अनेक लाभ बघायला मिळतील.***



**डॉ. दीपक शिकारपूर**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजेच 'इस्रो'ने पुन्हा एकदा जागतिक स्तरावर कर्तृत्वाचा झेंडा फडकावला. २४ डिसेंबर २०२५ रोजी श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून एलव्हीएम३-एम६ (LVM3-M6) या भारताच्या सर्वात शक्तिशाली रॉकेटचे यशस्वी प्रक्षेपण करण्यात आले. प्रचंड क्षमतेमुळे या रॉकेटला 'बाहुबली' असे टोपणनाव देण्यात आले आहे. हे केवळ एक रॉकेट प्रक्षेपण नव्हे, तर अंतराळ क्षेत्रातील भारताच्या वाढत्या व्यावसायिक ताकदीचे आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेचे एक जिवंत प्रतीक आहे. या मोहिमेद्वारे अमेरिकेचा 'ब्लू बर्ड ब्लॉक-२' हा महाकाय उपग्रह अवकाशात स्थापित करण्यात आला असून त्याचा थेट परिणाम आगामी काळात आपल्या मोबाईल वापरावर होणार आहे. या प्रक्षेपणाचा सर्वात मोठा आणि थेट फायदा सामान्य मोबाईल वापरकर्त्यांना मिळणार आहे. सध्या मोबाईलवर इंटरनेट वापरण्यासाठी आपण जमिनीवरील टॉवर्सवर अवलंबून असतो. मात्र, ब्लू बर्ड ब्लॉक-२ उपग्रहाच्या यशस्वी प्रक्षेपणामुळे 'डायरेक्ट-टू-स्मार्टफोन' ही नवी तंत्रज्ञान प्रणाली कार्यान्वित होणार आहे. यामुळे सामान्य ४ जी आणि ५ जी स्मार्टफोन्सना कोणत्याही विशेष उपकरणाशिवाय थेट अंतराळातून कनेक्टिव्हिटी मिळेल. यामुळे दुर्गम डोंगरदऱ्या, समुद्र किंवा मोबाईल टॉवर्स लावणे अशक्य असणाऱ्या ठिकाणीही आता हाय-स्पीड ब्रॉडबँड इंटरनेट उपलब्ध होईल. व्हॉईस कॉल, व्हिडिओ कॉल आणि डेटा स्ट्रीमिंग या सेवांमध्ये कोणताही खंड पडणार नाही. विशेषतः नैसर्गिक आपत्तीच्या काळात जमिनीवरील नेटवर्क ठप्प झाले असता ही सॅटेलाइट आधारित यंत्रणा विशेष महत्त्वाची ठरेल. यामुळे जगातील 'डिजिटल दरी' कमी होण्यास मदत होईल आणि ग्रामीण भागातील नागरिकही जागतिक माहिती तंत्रज्ञानाशी जोडले जातील.

एलव्हीएम ३-एम ६ ने अवकाशात सोडलेला ब्लू बर्ड ब्लॉक-२ हा उपग्रह एका फिरत्या 'मोबाईल टॉवर'सारखा काम करतो. सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे याचा २२३ चौरस मीटरचा विशाल अँटेना. इतका मोठा असल्यामुळेच तो पृथ्वीपासून ५०० ते ६०० किलोमीटर उंचीवरून तुमच्या खिशातील लहानशा मोबाईलमधील कमकुवत सिग्नल पकडून प्रतिसाद देऊ शकतो. पारंपरिक सॅटेलाइट इंटरनेटसाठी (उदा. स्टारलिंक) घराच्या छतावर एक विशेष 'डिश' लावावी लागते. परंतु या तंत्रज्ञानात उपग्रह थेट फोनमधील एलटीई (४जी) किंवा ५जी लहरींशी संवाद साधतो. या मोहिमेचा सर्वात मोठा आणि थेट फायदा व्होडाफोन आयडिया(व्हीआय)च्या वापरकर्त्यांना मिळण्याची शक्यता आहे. कारण 'एसटी स्पेसमोबाईल' (याचा उपग्रह ब्लू बर्ड ब्लॉक-२ इस्रोने सोडला आहे) या कंपनीने भारतात 'व्होडाफोन आयडिया'शी धोरणात्मक भागीदारी केली आहे. या करारानुसार, दुर्गम भागात कंपनीचे टॉवर्स पोहोचू शकत नसल्यास हा उपग्रह 'व्हर्च्युअल टॉवर' म्हणून काम करेल. त्यामुळे व्हीआय वापरकर्ते आपल्या सध्याच्या ४ जी किंवा ५ जी फोनवरून थेट उपग्रहाशी कनेक्ट होऊ शकतील. सरकारी कंपनी 'बीएसएनएल'ने "Viasat' (व्हीआयएएसएटी)या अमेरिकन कंपनीशी हातमिळवणी केली आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये त्यांनी 'डायरेक्ट-टू-डिवाईस' तंत्रज्ञानाची यशस्वी चाचणी केली होती.

बीएसएनएल विशेषतः आपत्कालीन सेवा, लष्करी गरजा आणि अतिदुर्गम भागातील नागरिकांसाठी सॅटेलाइट मेसेजिंग आणि कॉल सेवा सुरू करण्यावर भर देत आहे. रिलायन्स जिओ आणि भारती एअरटेल सध्या 'स्टारलिंक' आणि 'वनवेब' यासारख्या सेवांशी स्पर्धा किंवा सहकार्य करण्याच्या तयारीत आहेत. मात्र या सेवा सुरुवातीला 'फिक्स्ड वायरलेस ॲक्सेस' (घराच्या छतावर डिश लावून मिळणारे इंटरनेट) यावर केंद्रित असू शकतात. तरीही, भविष्यात 'एअरटेल' आणि 'जिओ'देखील वापरकर्त्यांना थेट स्मार्टफोन जोडणी देण्यासाठी स्वतःचे किंवा भागीदारीतील सॅटेलाइट नेटवर्क वापरू शकतात. अर्थात ही सेवा वापरण्यासाठी काही गोष्टींची माहिती असणे आवश्यक आहे. जसे की, फोन गेल्या दोन-तीन वर्षांमधील ४ जी किंवा ५ जी असेल तर या उपग्रहाशी जोडला जाऊ शकेल. अगदी स्वस्त ५ जी फोन्समध्येही हे तंत्रज्ञान काम करेल. नजिकच्या भविष्यात फोनच्या 'नेटवर्क सेटिंग्स'मध्ये 'सॅटेलाइट रोमिंग' असा पर्याय दिसू शकेल. तो सुरू केल्यानंतर तुम्ही टॉवरच्या कक्षेबाहेर गेल्यावरही फोन सुरू राहील. ही सेवा प्रामुख्याने समुद्रात मासेमारीसाठी जाणारे कोळी, हिमालयात जाणारे ट्रेकर्स, जंगलातील रिसॉर्टस आणि राष्ट्रीय महामार्गावरील सिग्नल नसणाऱ्या जागांवरुन प्रवास करणाऱ्या लोकांसाठी वरदान ठरेल. या तंत्रज्ञानाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे वापरकर्त्याला काहीही नवीन खरेदी करण्याची गरज नाही. म्हणजेच सॅटेलाइट फोन किंवा 'स्टारलिंक'सारख्या छतावर बसवण्याच्या अँटेनाची गरज भासणार नाही. सध्याचा ४जी/५जी एलटीई तंत्रज्ञान असणारा स्मार्टफोनच उपग्रहाशी जोडला जाईल.

या तंत्रज्ञानामुळे मोबाईल टॉवरची रेंज नसणाऱ्या ठिकाणी तुमचा फोन आपोआप उपलब्ध उपग्रह सिग्नल शोधेल. हे तंत्रज्ञान 'रोमिंग'प्रमाणेच काम करेल. या सेवेअंतर्गत सुरुवातीच्या टप्प्यात वापरकर्ते आपत्कालीन एसएमएस, साधे मेसेज आणि व्हॉईस कॉल करू शकतील. त्यानंतरच्या टप्प्यात हाय-स्पीड इंटरनेट आणि व्हिडिओ स्ट्रीमिंगची सुविधा उपलब्ध होईल. लवकरच टेलिकॉम कंपन्या ग्राहकांसाठी 'सॅटेलाइट ऑन डिमांड' प्लॅन्स आणू शकतात. उदाहरणार्थ, तुम्ही हिमालयात ट्रेकिंगला जाणार असाल तर काही दिवसांसाठी सॅटेलाइट कनेक्टिव्हिटीचा पॅक घेऊ शकाल. या नव्या सेवेचे अनेक लाभ मिळतील. जसे की, या प्रक्षेपणामुळे देशाच्या कानाकोपऱ्यात हाय-स्पीड इंटरनेट पोहोचेल. शिक्षण आणि आरोग्यासाठी त्याचा फायदा होईल. चक्रीवादळ किंवा पूर आल्यावर जमिनीवरील टॉवर्स कोसळले तरी उपग्रहाद्वारे मिळणारे नेटवर्क बचावकार्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरेल. ग्रामीण भागातील शेतकरी आणि छोटे व्यावसायिक उपग्रहाद्वारे इंटरनेटशी जोडले गेल्यामुळे थेट बाजारपेठेशी संपर्क साधू शकतील. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. थोडक्यात, या तंत्राचे दूरगामी परिणाम केवळ तांत्रिक प्रगतीत नाही तर आर्थिक आणि सामाजिक क्रांतीतही बघायला मिळतील. ई-कॉमर्सचा विस्तार झाल्यामुळे टियर ३ आणि ४ शहरांमधील छोटे दुकानदार आज 'अमेझॉन' किंवा 'फ्लिपकार्ट'सारख्या प्लॅटफॉर्मवर आपली उत्पादने विकतात. पण नेटवर्क नसेल तर ऑर्डर चुकतात. सॅटेलाइट इंटरनेटमुळे त्यांना कधीही न खंडित होणारे नेटवर्क मिळेल. याचा फायदा म्हणजे त्यांचा व्यवसाय २४ तास ऑनलाइन राहील.

दुसरी बाब म्हणजे आजही ग्रामीण भागातील दुकानांमध्ये नेटवर्क नसल्यास यूपीआय व्यवहार फेल होतात. मात्र 'बाहुबली' उपग्रहामुळे मिळणाऱ्या स्थिर नेटवर्कमुळे अगदी दुर्गम भागातील किराणा दुकानातही डिजिटल पेमेंट सहज शक्य होईल. फळे, भाजीपाला किंवा औषधे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेताना ट्रकच्या ट्रॅकिंगसाठी नेटवर्क आवश्यक असते. मात्र महामार्गावरील 'ब्लॅक स्पॉट' (नेटवर्क नसलेल्या जागा) मुळे यात अडचण येते. आता ही अडचणही सुटणार असून रिअल-टाइम ट्रॅकिंग शक्य होईल. सध्या खेड्यापाड्यातील बरीच मुले यूट्यूब किंवा इतर शैक्षणिक ॲप्सवरून अभ्यास करतात. पण पावसाळ्यात किंवा खराब हवामानात फायबर तुटल्यास यात खंड पडतो. सॅटेलाइट इंटरनेटमुळे ही अडचणही दूर होणार आहे. आणखी एक बाब म्हणजे छोट्या शहरांमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांची नेहमीच कमतरता असते. असे असताना सॅटेलाइट कनेक्टिव्हिटीमुळे ग्रामीण भागातील रुग्ण मोठ्या शहरातील डॉक्टरांशी व्हिडिओ कॉलद्वारे संपर्क साधू शकतील. वेळीच उपचार मिळून अनेकांचे जीव वाचू शकतील. याबरोबरच सरकारी सेवांमध्येही याची मदत होईल. जसे की, सातबारा उतारा काढणे, आधार अपडेट करणे किंवा पीक विम्याचे अर्ज भरणे अशा कामांसाठी चॉईस सेंटर किंवा ग्रामपंचायतीत इंटरनेट लागते.आता सॅटेलाइटमुळे या सेवांचे सर्व्हर कधीही 'डाऊन' राहणार नाहीत. या सेवेचा लाभ होमस्टे आणि हॉटेल व्यवसायालाही होईल. आपल्याकडे कोकण, सह्याद्रीचे गडकिल्ले किंवा गडचिरोलीसारख्या भागांमध्ये पर्यटन वाढत आहे. मात्र सध्या बऱ्याच पर्यटकांना 'वर्क फ्रॉम होम'ची इच्छा असते. नेटवर्क नसल्यास अशांची अडचण होते. मात्र सॅटेलाइट इंटरनेटमुळे अशा ठिकाणी 'वर्केशन' ही संकल्पना रुजेल आणि स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी मिळतील. आता शेतात बसवलेले सेन्सर (ते मातीतील ओलावा मोजतात) थेट सॅटेलाइटला माहिती पाठवू शकतील. यामुळे शेतकऱ्याला मोबाईलवर पिकाला कधी पाणी द्यायचे आहे, याच्या सूचना मिळतील. खेरीज पावसाचा अचूक अंदाज थेट मोबाईलवर मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळता येईल. थोडक्यात, 'बाहुबली' रॉकेटची ही झेप भारताच्या कानाकोपऱ्यातील शेवटच्या माणसाला 'डिजिटल इंडिया'चा खरा भाग बनवणार आहे. इस्रोचे हे 'बाहुबली' प्रक्षेपण भारताला 'सॅटेलाइट-टू-स्मार्टफोन' क्रांतीच्या शर्यतीत जगातील आघाडीच्या देशांच्या रांगेत उभे करत आहे.

**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)**

# भारत देश दहशतीच्या सावटाखाली

**वैष्णवी वाडकर**

गेल्या सहा महिन्यांत भारतातील अनेक मोठ्या शहरांना दहशतवादी धमक्यांचे इशारे मिळाले आहेत. विशेषतः मुंबई, दिल्ली आणि बेंगळुरूसारख्या शहरांमधील नागरिकांमध्ये अशा धमक्यांमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे देशाच्या सुरक्षेबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. एप्रिल २०२५ मध्ये जम्मूकाश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देश हादरून गेला होता. या हल्ल्यानंतर केवळ सुरक्षेचा प्रश्नच नाही, तर अफवांचाही मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला. सोशल मीडियावर युद्ध, हल्ले आणि मोठ्या संकटांबाबत खोटी व अप्रमाणित माहिती पसरू लागली. त्यामुळे लोकांमध्ये भीतीचे प्रमाण वाढू लागले. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला ठाम आणि सडेतोड उत्तर दिले असले तरी भारताला सातत्याने दहशतवादी धमक्या दिल्या जात आहेत. लोकांच्या मनात भीती निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू असून देशातील शांतता बिघडवणे हाच दहशतवाद्यांचा उद्देश असल्याची चर्चा नागरिकांमध्ये होत आहे.

गेल्या वर्षभरात भारतातील मोठ्या शहरांमध्ये सतत मिळणाऱ्या दहशतवादी धमक्यांचा धोका वाढला आहे. मुंबई व दिल्लीला बॉम्बस्फोटांच्या धमक्या, लाल किल्ला स्फोट आणि सोशल मीडियावर पसरवण्यात आलेल्या अफवांमुळे नागरिकांमध्ये दहशत पसरली आहे. मध्यंतरी मुंबईत अनंत चतुर्दशीच्या पार्श्वभूमीवर वाहतूक पोलिसांच्या व्हाट्सॲपवर ३४ वाहनांमध्ये मानवी बॉम्ब ठेवल्याचा धमकीचा संदेश देण्यात आला होता. महाराष्ट्रात मुख्यतः मुंबईत गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या प्रमाणात गर्दी असल्यामुळे हा संदेश मुंबईकरांमध्ये मोठी दहशत निर्माण करणारा ठरला. त्यांनतर मुंबईतील नायर रुग्णालय, छत्रपती शिवाजी महाराज आंतराष्ट्रीय विमानतळ व मुंबई उच्च न्यायालय बॉम्ब स्फोटात उडवून देणारे धमकीचे ई-मेल पाठवण्यात आले होते. तसेच, सप्टेंबर महिन्यातच जवळपास ३ ते ४ वर बॉम्बस्फोटाच्या धमक्या देण्यात आल्या होत्या. त्यानंतर, दिल्ली उच्च न्यायालयालात न्यायाधीशांच्या खोलीच्या कोर्ट रूममध्ये ३ बॉम्ब ठेवल्याचा ई-मेल देखील पाठवण्यात आला होता. विशेष म्हणजे त्यात पाकीस्तान व तामिळनाडूचे संगनमत असल्याचे लिहण्यात आले होते. त्यामुळे गेल्या वर्षभरात जवळपास प्रत्येक महिन्याला भारतात बॉम्ब स्फोट सारख्या दहशतवादाच्या खबरा मिळत आहेत. प्रत्येक वेळी पोलीस व सुरक्षा यंत्रणांनी तपास केला असता कोणतेही ठोस पुरावे किंवा घटना स्थळी बॉम्ब आढळून आले नाहीत. त्यामुळे लोकांच्या मनात दहशत निर्माण व्हावी यासाठी अशाप्रकारच्या धमक्या दिल्या जात असल्याचे बोलले जात आहे.

अशातच गेल्यावर्षी १० नोव्हेंबर रोजी दिल्लीतील लाल किल्ला परिसरात मेट्रो स्टेशनजवळ एका कारमध्ये शक्तीशाली स्फोट झाला. हा स्फोट म्हणजे दहशतवादी हल्लाच होता. त्यावेळी आय-२० या कारमध्ये स्फोटके लावून आत्मघाती हल्ल्याच्या हेतून हा स्फोट घडविण्यात आला असल्याचा संशय गुप्तचर संस्थांनी व्यक्त केला होता. या हल्ल्यात एकूण १५ जणांचा मृत्यू झाला होता. तसेच, अनेक जण गंभीर जखमी झाले होते. तेव्हापासून पुर्ण देश दहशतीच्या सावटाखाली गेला आहे. त्यानंतर पुन्हा प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर राजधानी दिल्लीसह देशातील चार राज्यांमध्ये दहशतवादी हल्ल्याची शक्यता वर्तवली जात आहे. याबाबतची माहिती मिळताच देशाच्या गुप्तचर यंत्रणांनी हाय अलर्ट जारी केला आहे. २६ जानेवारीपूर्वी खलिस्तान आणि परदेशस्थित दहशतवादी संघटनेकडून हल्ल्याचा कट रचला जात असल्याचे गंभीर इशारे मिळाले आहेत. त्यामुळे सुरक्षायंत्रणा पूर्णतः सतर्क करण्यात आल्या आहेत. मात्र, देशातील सर्वसामान्य नागरिक पुन्हा दहशतीच्या सावटाखाली जात असल्याचे निदर्शनास येत आहे. पंजाबमधील काही कुख्यात गँगस्टर परदेशातून कार्यरत खलिस्तानी आणि कट्टरपंथी हँडलर्ससाठी फूट सोल्जर म्हणून काम करत आहेत, असे बोलले जात आहे. भारताची अंतर्गत सुरक्षा कमकुवत करण्यासाठी आणि आपला अजेंडा राबवण्यासाठी हे हँडलर्स गुन्हेगारी नेटवर्कचा वापर करत असल्याचे समोर येत आहे. भारताच्या गुप्तचर अहवालानुसार हे गँगस्टर हरियाणा, दिल्ली-एनसीआर, उत्तर प्रदेश आणि राजस्थानमध्ये सक्रिय असून, त्यांचा खलिस्तानी दहशतवादी संघटनांशी संपर्क दिवसेंदिवस वाढत आहे. दरम्यान, प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर गुप्तचर संस्थांनी व्यक्त केलेल्या दहशतवादी स्फोटाच्या धोक्यामुळे पुन्हा एकदा दिल्लीसह संपूर्ण देश दहशतीच्या सावटाखाली आला आहे. या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांनी संवेदनशील व गर्दीच्या ठिकाणी मॉक ड्रिल घेत आहे. मॉक ड्रिल द्वारे सुरक्षा यंत्रणा व नागरिकांना सतर्क करण्यात आले आहे. या घटनांमधून स्पष्ट होते की, दहशतवाद्यांचा उद्देश हा फक्त हिंसा करणे नाही तर लोकांमध्ये दहशत निर्माण करणे हा आहे. त्यामुळे या धमक्यांकडे दुर्लक्ष न करता नागरिकांनी जागरूक राहणे, सार्वजनिक ठिकाणी सुरक्षितता पाळणे आणि सुरक्षा यंत्रणांना सहकार्य करणे अत्यंत गरजेचे असल्याचे सुरक्षा यंत्रणांकडून सांगण्यात येत आहे.

## लोकसंसद

### मताची किंमत आणि लोकशाहीचे दुर्दैव

महाराष्ट्रात नुकत्याच २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाले. या निकालांपेक्षा अधिक चिंताजनक बाब म्हणजे निवडणूक काळात जवळपास प्रत्येकच पक्षाकडून मतदारांना पैसे, वस्तू व विविध प्रलोभने दिल्याच्या बातम्या मोठ्या प्रमाणावर समोर आल्या. यावरून आजच्या लोकशाहीत केवळ काम करणारा उमेदवार किंवा पक्ष निवडून येण्यासाठी पुरेसा ठरत नाही, हे कटू वास्तव प्रकर्षाने समोर येते. आज काम करणे ही जणू एक औपचारिक अट बनली आहे. मतदारांना आकर्षित करण्यासाठी प्रलोभने देणे ही सर्वच पक्षांची अपरिहार्य मजबुरी झाल्याचे चित्र आहे. ''फक्त विकासकामांच्या जोरावर निवडून येऊ'' ही संकल्पना हळूहळू काल्पनिक ठरत चालली आहे, आणि ही बाब अत्यंत गंभीर आहे. जे पक्ष किंवा उमेदवार अशा प्रलोभनांच्या आधारावर सत्तेत येतात, ते सत्तेवर आल्यानंतर नागरिकांसाठी व समाजासाठी काम करताना या खर्चाचा हिशोब मनात न आणतील, अशी अपेक्षा करणे भोळेपणाचे ठरेल. राजकारणात केलेली प्रत्येक गुंतवणूक ही परतफेडीच्या अपेक्षेनेच केली जाते. त्यामुळे निवडणुकीदरम्यान वाटप केलेल्या पैशांची व वस्तूंची वसुली पुढे कुठून होणार, हा प्रश्न अपरिहार्यपणे उपस्थित होतो. ही वसुली अखेरीस जनतेकडूनच, आणि तीही जनतेच्या कराच्या पैशातूनच होणार, हे उघड सत्य आहे. पण ही वसुली केवळ निवडणुकीच्या खर्चापुरतीच मर्यादित राहील, याची शाश्वती कोण देणार? एकदा सत्तेची चव आणि पैसा वसुलीची सवय लागल्यानंतर ती इथेच थांबेल, अशी अपेक्षा करणे वास्तववादी ठरणार नाही. लोकशाही व्यवस्थेत राजकीय नेत्यांवर समाजाचा नैतिक दबाव असणे आवश्यक आहे. मात्र नेत्यांच्या प्रलोभनांना बळी पडणारा समाज गृहीत धरला जातो आणि पुढील पाच वर्षे जनतेचा पैसा अनिर्बंधपणे लुटला जातो. कागदावर अत्यंत शक्तिशाली असलेल्या लोकशाहीत प्रत्यक्षात मतदाराची किंमत मतदानाच्या दिवशी त्याच्या मतापुरतीच मर्यादित राहते. आपणच अशा प्रलोभनांना स्वीकारून राजकारण्यांना चुकीच्या सवयी लावतो आणि नंतर ''ते चुकतात'', ''सगळेच भ्रष्ट आहेत'' अशा तक्रारी करतो. हा दुटप्पीपणा आपल्या लोकशाहीला अधिक कमकुवत करत आहे. लोकशाहीत मत हे केवळ अधिकार नाही, तर ते एक मोठे सामाजिक व नैतिक दायित्व आहे. क्षणिक लाभासाठी मत विकले गेले, तर त्याची किंमत समाजाला आणि पुढील पिढ्यांना दीर्घकाळ मोजावी लागते. प्रलोभनांच्या आधारे चालणारी लोकशाही ही जनतेच्या हातातील सत्ता हळूहळू हिरावून घेणारी आणि लोकशाहीच्या मूळ आत्म्यालाच पोखरणारी ठरते.

**- अनिकेत शेटे, पुणे**

## दिनविशेष

# सुप्रसिद्ध विनोदी लेखक चि. वि. जोशी

चिंतामण विनायक जोशी हे सुप्रसिद्ध मराठी विनोदी लेखक होते. त्यांचा जन्म १९ जानेवारी १८९२ रोजी पुणे येथे झाला. त्यांचे नूतन मराठी विद्यालयात प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण झाले. फर्ग्युसन कॉलेजातून बी. ए. (१९१३), एम. ए. (१९१६) झाले. त्यांचा पाली भाषेचा विशेष व्यासंग होता. त्यांनी आरंभी चार वर्षे सरकारी शिक्षणखात्यात माध्यमिक शिक्षक म्हणून काम केले. पुढे १९२० पासून बडोदा कॉलेजात पाली, इंग्रजी आणि मराठी या भाषांचे प्राध्यापक म्हणून काम केले. 'अ मॅन्युअल ऑफ पाली सद्धम्मप्पकासिनी' (संपादक), 'पाली कंकॉर्डन्स' (कोश), 'जातकांतील निवडक गोष्टी' (१९३०), 'शाक्यमुनि गौतम' (१९३५), 'बुद्धसंप्रदाय व शिकवण' (१९६३) ही त्यांची ग्रंथनिर्मिती त्यांच्या पालीच्या व्यासंगाची द्योतक आहे, पण याहीपेक्षा चाळीसांवर पुस्तके लिहून त्यांनी मराठी विनोदाच्या क्षेत्रात जी कामगिरी बजावली ती विशेष महत्वाची होय. विनोदी लेखनाची प्रेरणा त्यांना कोल्हटकर-गडकऱ्यांच्या कोटित्वयुक्त लेखनातून मिळाली व त्याचा ठसा आपणास त्यांच्या प्रारंभीच्या 'एरंडाचे गुऱ्हाळ' (१९३२) मधील लेखन व 'चिमणरावांचे चऱ्हाट'(१९३३) मधील विवाहविषयक लेख यांवर स्पष्ट दिसतो. त्याच्या कथांवर आधारित 'सरकारी पाहुणे', 'लग्न पाहावं करून' सारखे सिनेमे आणि मुंबई दूरदर्शनवरची मालिका यांनी मराठी माणसांच्या मनात घरं केलं. चिमणराव, गुंड्याभाऊ, काऊ, मोरू, मैना, राघू असे सर्वच कुटुंबीय जणू दर्शकांच्या घरचेच होऊन गेले होते. त्यांच्या चित्रणात अतिशयोक्तीपेक्षा स्वभावोक्तीवर आणि समाजसुधारणेच्या मंडनापेक्षा मानवी स्वभावातील साध्यासुध्या विसंगतींच्या दर्शनावर भर राहिला. त्यांची निवेदनशैलीही मर्मभेदक कोटित्वापेक्षा मार्मिक व स्वाभाविक संवादांनी नटलेली आहे. त्यामुळे त्यांचे लेखन निबंधरूप होण्याऐवजी त्याला ललित कथेचा घाट प्राप्त झाला व त्यातून मध्यमवर्गीयांचे एक अस्सल व स्वयंपूर्ण विश्व साकार झाले. अशा या सुप्रसिद्ध लेखकाचे २१ नोव्हेंबर १९६३ रोजी निधन झाले. मराठीतील अनेक महत्त्वाचे लेखक, समीक्षकांचे चिंवचे साहित्यातील योगदान सांगणारे आणि त्यांच्या विनोदाचे स्वरूप स्पष्ट करणारे लेख या पुस्तकात समाविष्ट करण्यात आले आहेत. चित्रपट, दूरदर्शनवरील चिमणराव आता नव्या पिढीला माहीत नाहीत. त्यादृष्टीने त्यांची ओळख करून देणारे तीन लेख आणि जवळच्या मित्र-आप्तांनी त्यांची वेगळ्या पद्धतीने करून दिलेल्या ओळखी हे या पुस्तकाचे खास वैशिष्ट्य आहे. शेवटी जोडलेल्या तीन परिशिष्टांनी त्यांचे साहित्यातील योगदान अधिक गडदपणे ठसवले आहे. त्यांच्या मृत्यूनंतर पन्नास वर्षांनी प्रसिद्ध झालेले हे पुस्तक अनेक दृष्टीने महत्त्वाचे आहे. हसू येत असताना ते निष्कारण दाबून टाकणे हा एक फाजील शिष्टपणा आहे आणि दुसऱ्याच्या भावना दुखविणारे हास्य दाबून टाकणे हा शिष्टाचार आहे; असे सांगणारे चिंवि सामान्य व्यक्तीच्या दैनंदिन जीवनातील तितक्याच सामान्य गोष्टींतून हास्यनिर्मिती करतात. जीवनातील अशा जागा शोधण्यासाठी एक दृष्टी असावी लागते ती त्यांच्याजवळ होती. समाजाचे आणि मानवी स्वभावाचे सूक्ष्म निरीक्षण आणि विसंगतींवर बोट ठेवून ते आपली विनोदनिर्मिती साधतात. त्यांच्या या विनोदाच्या अनेक परी चिकित्सकदृष्टीने हेरून अभ्यासकांनी केलेली चिकित्सा विनोदाची तात्त्विक बाजू समजून घेण्यासाठीही महत्त्वाची आहे. चिंविच्या निवडक लेखनाचे संकलन असलेल्या 'हास्यचिंतामणी' या ग्रंथाला त्यांनीच दीर्घ प्रस्तावना लिहिली आहे.

# कार्यकर्त्यांनो, जोमाने कामाला लागा

## पुंडलिक पाटील यांचे आवाहन


(छायाचित्र : संजय गायकवाड)

। कर्जत । प्रतिनिधी ।

नगरपरिषद निवडणुकीत घवघवीत यश मिळाल्यानंतर घडलेली दुर्दैवी घटना ही कटाचा भाग असून, निष्कारण आपल्या नेत्याला त्रास दिला जात आहे. तरीसुद्धा कार्यकर्त्यांनी कोणतीही चिंता न करता जोमाने कामाला लागावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी सभापती पुंडलिक पाटील यांनी केले. परिवर्तन आघाडीच्या माध्यमातून आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांना सामोरे जात असून, कायद्याची प्रक्रिया सुरू असल्याने लवकरच सर्व काही सुरळीत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका जाहीर झाल्याच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने कर्जत येथील जनसंपर्क कार्यालयात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत मार्गदर्शन करताना पुंडलिक पाटील बोलत होते. त्यांनी सांगितले की, नगरपरिषद निवडणुकीच्या यशाचा आनंद साजरा होत असतानाच एक कटू प्रसंग घडला. सुतारवाडी येथे कट रचल्याचा आरोप केला जात आहे. मात्र, त्या ठिकाणी चारशेहून अधिक कार्यकर्ते उपस्थित होते. अशा परिस्थितीत असे काही होणे शक्य नाही. काय चालले आहे, हे सर्वांना माहीत आहे. अगदी पोलीस अधीक्षकांनाही याची माहिती आहे. त्यामुळे घाबरण्याचे कोणतेही कारण नाही.

ते पुढे म्हणाले की, आपण परिवर्तन आघाडीच्या माध्यमातून निवडणुकीला सामोरे जात आहोत. तडजोडीअंती एखाद्या चांगल्या कार्यकर्त्याला उमेदवारी मिळाली नाही, तरी कुणीही नाराज होऊ नये. आपली सत्ता आली तर प्रत्येक कार्यकर्त्याला निश्चितच सन्मान मिळेल.

यावेळी तालुका अध्यक्ष दीपक श्रीखंडे यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका परिवर्तन आघाडीच्या माध्यमातून लढविण्याचा निर्णय झाला आहे. इतर पक्षांशीही चर्चा सुरू असून, उमेदवार निवडीसाठी वेळ लागत आहे. त्यामुळे सर्व कार्यकर्त्यांनी परिस्थिती समजून घ्यावी, असे त्यांनी स्पष्ट केले. ॲड. राजेंद्र निगुडकर यांनी लवकरच आपले नेते सुधाकर घारे कर्जत येथे येणार असल्याचे सांगून, तोपर्यंत सर्वांनी संयम राखावा, असे आवाहन केले. मधुकर घारे यांनीही आपल्यावर लादलेले संकट लवकरच दूर होईल. सत्य हे सत्यच असते. कुणीही विचलित न होता, दबावाला बळी न पडता निवडणुकीसाठी सज्ज राहावे, असे मत व्यक्त केले.

यावेळी ॲड. रंजना धुळे, एकनाथ धुळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. बैठकीचे आभार प्रदर्शन शरद तवळे यांनी केले. या आढावा बैठकीस तालुका अध्यक्ष दीपक श्रीखंडे, जिल्हा सरचिटणीस एकनाथ धुळे, कार्याध्यक्ष अशोक भोपतराव, शहराध्यक्ष भगवान भोईर, तालुका महिला अध्यक्ष रंजना धुळे, नारायण डामसे, धोंडू राणे, अशोक सावंत, परशुराम घारे, बाळू थोरवे, राजेंद्र निगुडकर, अवेश जुवारी, ऋषिकेश राणे, अरुण हरपुडे, पंकज पाटील यांच्यासह विलास माळी, मंगल ऐनकर, प्रमोद पिंगळे, राजाभाऊ कोठारी, लक्ष्मण लोहकरे, समीर देशमुख, भानुदास मिसाळ, अमीर माणियार आदींसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# निवडक



## निलेश पिंपरकर यांची नियुक्ती

**नेरळ** : कर्जत तालुक्यात भारतीय जनता पक्षाचे तीन मंडल असून त्यातील कर्जत ग्रामीण मंडळाचे सरचिटणीस पदावर निलेश पिंपरकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकीत निलेश पिंपरकर यांच्यावर सरचिटणीस पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. कर्जत ग्रामीण मंडळ अध्यक्ष दिनेश रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. दरम्यान, सरचिटणीस पद रिक्त असल्यामुळे दिनेश पिंपरकर यांची कर्जत ग्रामीण मंडळ सरचिटणीस पदी निवड करून पत्र देण्यात आले. याच बैठकीत निलेश पिंपरकर यांची भारतीय ग्रामीण मंडळ कर्जत सरचिटणीस पदावर नियुक्ती करण्यात आली.



## विद्यार्थ्यांनी काढली रस्ता सुरक्षेची रॅली

**कर्जत** : कोंकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर वेणगाव येथील श्री महालक्ष्मी मंदिराच्या परिसरात सुरु आहे. या शिबिरात पनवेल विभागीय मोटर परिवहन कार्यालयाच्या वतीने रस्ता सुरक्षेचे धडे देण्यात आले. तसेच शिबिरार्थी विद्यार्थ्यांनी जनजागृती रॅली काढली.समर्थ मोटार ट्रेनिंग स्कूलच्या सहकार्याने रस्ता सुरक्षा जनजागृती महिन्याचे औचित्य साधून मोटर वाहन निरीक्षक जय शेट्ये, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक कल्याणी सुराटकर, यांनी राष्ट्रीय सेवा योजना शिबिराला भेट देऊन रस्ता सुरक्षे बाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर शिबिरार्थींनी जनजागृती साठी रस्ता सुरक्षा रॅलीचे आयोजन केले होते. याप्रसंगी शिबिरार्थी विद्यार्थ्यांनी रस्ता सुरक्षा विषयक घोषणा दिल्या. या रॅलीला शेट्ये यांनी हिरवा झेंडा दाखविला. याप्रसंगी उप प्राचार्य डॉ. अमोल चांदेकर, प्रा. अनिकेत इंदुलकर, प्रा. निलेश बोंडे आदी उपस्थित होते.



## दिव्यांग महिलेला किचन सेटचे वाटप

**कोलाड** : डॉ. गांधी हॉस्पिटल कोलाड येथील लायन्स क्लब कोलाडच्या व्हिजन सेंटर येथे शुक्रवार, दि.१६ जानेवारी रोजी लायन्स नमिता मिश्रा, लायन्स आलोकजी मिश्रा, तसेच लायन्स क्लब कोलाड यांच्या संयुक्त विद्यमाने गोवे येथील छाया प्रफूल धनावडे या महिलेला किचन सेटचे वाटप करण्यात आले.लायन्स क्लब कोलाड या क्लबसाठी लायन नमिता मिश्रा व लायन आलोकजी मिश्रा यांचे सदैव मोलाचे योगदान असते. यांच्याकडे कोणत्याही मदतीची मागणी केली असता त्यांच्याकडून त्वरित ती पूर्ण केली जाते. असेच गांधी हॉस्पिटलसमोर दिव्यांग महिला छाया धनावडे ही वडापाव व चहा टपरीचा चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहे. या महिलेला मदतीचा हात म्हणून लायन मिश्रा दांपत्याकडून किचन सेटचे मोफत वाटप करण्यात आले. यावेळी लायन्स नमिता मिश्रा, आलोक मिश्रा, ए.के सहा, हेमंत लोणकर, कोलाड लायन्स क्लबचे अध्यक्ष ॲड. रवींद्र लोखंडे, माजी अध्यक्ष नरेश बिरगावले, उपाध्यक्ष डॉ. श्यामभाऊ लोखंडे, डॉ. विनोद गांधी, सेक्रेटरी अलंकार खांडेकर, खजिनदार गजानन बामणे, दिनकर सानप, विठ्ठल सावळे, दिलीप मोहिते, पूजा लोखंडे, छाया धनावडे, प्रफुल्ल धनावडे तसेच कोलाड लायन्स क्लबचे असंख्य सदस्य उपस्थित होते.

## रसायनीत किराणा दुकान फोडले

**रसायनी** : रसायनी पोलीस ठाणे हद्दीतील चावंढोली गावात १७ जानेवारी रोजी पहाटे अज्ञात चोरट्यांनी किराणा दुकान फोडल्याची घटना घडली. श्रीराम किराणा सुपर मार्केटच्या छतावरील सिमेंटचा पत्रा तोडून चोरट्यांनी आत प्रवेश केला. दुकानातील रोख रक्कम व इतर मुद्देमाल असा एकूण ३१ हजार ७०० रुपयांचा माल चोरून नेण्यात आला. सकाळी दुकान उघडण्यास आल्यावर हा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# नेरळ रेल्वे स्थानक परिसराची महापुरातून सुटका

**■ अनेक वर्षांच्या पाठपुराव्याला यश**



। नेरळ । प्रतिनिधी ।

माणगाव टेकडीपासून वाहणारे पाणी रेल्वे मार्गाखालून जाण्यासाठी असलेले साकव पुलाची रुंदी कमी असल्याने नेरळ गावातील पाडा परिसरात मोठ्या प्रमाणावर पावसाळ्यात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे रेल्वेकडून रेल्वे मार्गिकेच्या खाली असलेल्या साकव पुलाची रुंदी वाढवण्यात यावी, अशी मागणी नेरळ ग्रामस्थ २०१८ पासून करीत होते. पावसाळ्यात नेरळ गावात शिरणारे पाणी याचा बंदोबस्त करण्यासाठी मध्य रेल्वे प्रशासनाकडून साकव पुलाची पाणी वाहून जाण्याची क्षमता वाढवण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे नेरळ गावातील पाडा, मातोश्रीनगर भागात पावसाळ्यात महापुराची भीती कमी होण्याची शक्यता आहे.

मुंबई-पुणे मार्गावर नेरळ रेल्वे स्टेशनवरून कर्जतकडे जातांना किमी ८६/० ते ८७/० मध्ये असलेल्या पूल क्रमांक ८६/५ आहे. त्या पुलाखालून पाणी वाहून जाण्यासाठी असलेली रुंदी कमी असल्याने तेथून पाणी वेगाने पुढे वाहते. त्याचा परिणाम पावसाळ्यात सतत पाऊस सुरु असल्यास मोठ्या प्रमाणात पाणी त्या साकव पूलमध्ये अडकते आणि ते पाणी आजूबाजूंच्या लोकवस्तीत शिरते. त्यामुळे पाडा आणि मातोश्रीनगरमधील रहिवाशांच्या घरात पाणी शिरत असते आणि मोठ्या प्रमाणात सामानाची नासधूस होते. ही बाब लक्षात घेऊन स्थानिक ग्रामस्थ सूर्यकांत चंचे यांच्याकडून मध्य रेल्वे प्रशासनकडे पाठपुरावा करण्यात येत होता. त्याचवेळी मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेंद्र थोरवे आणि नेरळ ग्रामपंचायतीकडे तसेच मध्य रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा सुरु होता.

# पनवेलमध्ये भटक्या कुत्र्यांच्या समर्थनार्थ साखळी आंदोलन



। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल येथील पेशवेकालीन वडाळे सरोवर परिसरात भटक्या कुत्र्यांना उचलण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या निषेधार्थ विविध सामाजिक संस्थांच्या वतीने रविवार, दि. १८ जानेवारी रोजी साखळी आंदोलन करण्यात आले. ‘रस्ते सर्वांसाठी आहेत, भटक्या कुत्र्यांसाठीही आहेत’ असा संदेश देत आंदोलनकर्त्यांनी भटक्या प्राण्यांच्या हक्कांसाठी आपली भूमिका ठामपणे मांडली.

या आंदोलनात प्राणीप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते, तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विशेष म्हणजे लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत शांततामय मार्गाने निषेध व्यक्त केला. भटक्या कुत्र्यांना हटविण्याऐवजी त्यांचे लसीकरण, निर्बिजीकरण आणि पुनर्वसन करण्यावर भर देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

# वेताळवाडी शाळेत वृत्तपत्र वाचन उपक्रम

। खांब । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यातील वेताळवाडी येथील रा.जि.प.प्राथमिक शाळेमध्ये नववर्षाचे औचित्य साधून शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजावी म्हणून जगाच्या दैनंदिन घडामोडींचे ज्ञान व माहिती मिळावी याच अनुषंगाने ‘वृत्तपत्र वाचन’ उपक्रमाने २०२६ हा नवोपक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.

या वृत्तपत्र वाचन स्तुत्य उपक्रमाचे शालेय वृत्तपत्र उपक्रमाचे उद्घाटन शालेय व्यवस्थापन कमिटी अध्यक्ष मंगेश हंबीर यांच्या हस्ते व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये शालेय जीवनापासूनच वाचन, लेखन, निरीक्षणशक्ती व अभिव्यक्ती कौशल्य विकसित व्हावे या उद्देशाने मुख्याध्यापक केशव भागोजी भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली स्तुत्य उपक्रम सुरू करण्यात आले असल्याचे सांगितले. याप्रसंगी मुख्याध्यापक केशव भागोजी भोईर, मंगेश हंबीर (शा.व्य कमिटी अध्यक्ष) ग्रामस्थ मालु शिद, अंबाजी शिद, धर्मा वारगुडे, संजय शिद, रमेश हंबीर, माजी विद्यार्थी, भास्कर वारगुडे, अरविंद शिद, संदेश वारगुडे, स्वयंम पिंगळा आदी मान्यवर उपस्थित होते.

# एकसंघतेमुळे अखंड हरिनाम सोहळा यशस्वी

## देहू महाराज मेंगाळ यांचे उद्गार



। नेरळ । प्रतिनिधी ।

कोल्हारे गावातील वारकऱ्यांना स्थानिक तरुणांनी दिलेले पाठबळ महत्वाचे असून, ग्रामस्थांच्या एकीच्या बळामुळे या गावातील अखंड हरिनाम सोहळा यशस्वी होत असतो. ग्रामस्थांच्या एकीचा आदर्श आजूबाजूच्या ग्रामस्थांनी समजून घ्यायला हवा, असे आवाहन चाफेवाडी स्थित मठाधिपती हभप देहू महाराज मेंगाळ यांनी केले.

कर्जत तालुक्यातील कोल्हारे येथील श्री विठ्ठल रखुमाई हरिपाठ मंडळ आणि ग्रामस्थ मंडळ यांच्या माध्यमातून दीड दिवसांचा अखंड हरिनाम सोहळा आयोजित करण्यात आला होता. विठ्ठल रखुमाई मंदिराचे समोर आयोजित केलेल्या अखंड हरिनाम सोहळ्यामध्ये दीपोत्सवाचे आयोजन केले होते. या दीपोत्सव सोहळ्याला हभप देहू महाराज मेंगाळ, प्रवचनकार रमेश महाराज श्रीखंडे, कर्जत तालुका आगरी समाज संघटना अध्यक्ष संतोष पेरणे, भाजप विधानसभा मतदारसंघ प्रमुख किरण ठाकरे, कोल्हारे ग्रामपंचायत सरपंच महेश विरले, तसेच शशिकांत मोहिते, चोपदार नाना महाराज, संन्यासी बाबा बार्डी, कराळे डोंगर न्हवे, हभप मधुकर महाराज कराळे, नामदेव महाराज उगले खोपिवली, जिल्हा परिषद माजी सदस्य जयश्री कराळे, हरिभाऊ महाराज पारधी, सुरेश गोमारे आदी मान्यवर उपस्थित होते.

या सर्व मान्यवरांचे स्वागत ग्रामस्थ मंडळाचे हभप विठ्ठल गवळी हजारे, विजय हजारे नरेंद्र गोमारे, जयेश जोशी, विलास हजारे, अनिल गायकवाड यांनी केले. चौथ्या वर्षी आयोजित केलेल्या अखंड हरिनाम सोहळ्याचे आयोजनात विठ्ठल रखुमाई मित्र मंडळ, जय डाबाया मित्र मंडळ, गावदेवी मित्र मंडळ,आई एकविरा मित्र मंडळ, श्री गणेश मित्र मंडळ, सर्व शर्यती ग्रुप आणि तुंगा माता म्युझिक, आर एन म्युझिक यांनी केले आहे.

## पेणमध्ये घरफोडी

**पेण** : पेण पोलीस ठाणे हद्दीतील दुष्मी गावात १७ जानेवारी रोजी अज्ञात चोरट्याने घरफोडी केल्याची घटना घडली. आरोपीने घराच्या मुख्य दरवाजाचा लॉक तोडून आत प्रवेश केला व आत जाऊन दुसरा लॉक लावून घरफोडी केली. घरातील सोन्याचे दागिने तसेच किचनमध्ये ठेवलेली रोख रक्कम व बेडरूममधील पैसे असा एकूण २ लाख ५४ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मानिवलीत आज हुतात्मा हिराजी पाटील यांची जयंती

**■ सात ब्रास बँड पथकांकडून अभिवादन**

**■ आगरी समाज भूषण पुरस्काराचे होणार वितरण**



। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील मानिवली गावचे स्वातंत्र्यलढ्यात हौतात्म्य प्राप्त झालेले क्रांतिकारक हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील यांची ११२ वी जयंती सोमवार, दि. १९ जानेवारी रोजी साजरी होणार आहे. या जयंती सोहळ्याचे आयोजन मानिवली येथील हुतात्मा हिराजी पाटील स्मारक येथे करण्यात आले असून, कर्जत तालुका आगरी समाज संघटना व मानिवली हुतात्मा स्मारक समिती फाऊंडेशन यांच्या वतीने हा कार्यक्रम होणार आहे.

हुतात्मा हिराजी पाटील यांचा जन्म १९ जानेवारी १९१४ रोजी झाला होता. त्यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात आगरी समाज भूषण पुरस्काराचे वितरण करण्यात येणार असून, कर्जत तालुक्यातील सात ब्रास बँड पथक आपल्या सादरीकरणातून हुतात्म्यांना अभिवादन करणार आहेत.

या कार्यक्रमाला राज्याचे माजी मंत्री व आगरी समाजाचे प्रमुख नेते जगन्नाथ पाटील, भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुरेश उर्फ बाळ्यामामा म्हात्रे, नवी मुंबई आगरी-कोळी फाऊंडेशनचे अध्यक्ष निलेश पाटील, तालमणी पंडित प्रतापबुवा पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. यावर्षीचा हुतात्मा हिराजी पाटील आगरी समाज भूषण पुरस्कार आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत, कर्जत तालुक्यातील तुकाराम कोळंबे (मरणोत्तर) व सावळाराम ठाकूर यांना प्रदान करण्यात येणार आहे. तसेच रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, कर्जत तालुका आगरी समाज संघटनेचे माजी अध्यक्ष नागो गवळी, सावळाराम जाधव, एकनाथ धुळे यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- बागायती वाडी विक्री -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २७ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव-थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३
- प्रा.लि. कंपनीसाठी फ्लॅट, बंगलो भाड्याने व विकत पाहिजे. प्रत्यक्ष मालकांनी फोन करणे. ९८३४९९१२३६
- नवीन बिल्डींग मधील १ BHK फ्लॅट भाड्याने व विकत देणे आहे. मो. ९९२३६०५४४६
- 1st floor ८५० sqft 4 bed२४ तास पाणी, पार्किंग, भाड्याने आणि दोन दुकाने १०x१०(५०००/-महिना भाडे) १०x५ (४०००/-महिना भाडे) भाडेतत्वावर देणे आहे. संपर्क : ९४२३३७७४२२
- ऑफिस कामाकरिता अनुभवी कॉम्प्युटर ऑपरेटर , ऑफिस असिस्टंट मुलगा व रिसेप्शनिस्ट मुलगी पाहिजे. शिक्षण – ग्रॅज्युएशन पूर्ण. Typing, MS-CIT. संपर्क – सौ.रेश्मा पाटील पत्ता– अलिबाग ७०८३३९९५३३ वेळ – ११.०० ते५.००
- नागाव मधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे . रिसेप्शनिस्ट, १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसॲप वर मेसेज करावा. मोबाईल – ७५५९१८४६१२
- एका ऑफिसकरता सेकंडहँड लॅपटॉप पाहिजेत. त्वरीत संपर्क करा. ८००७८९७८६६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

**कर्जत येथील स्पर्धेत जिल्ह्यातील महिला डॉक्टरांचा सहभाग | विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव**

# डॉ. प्राजक्ता पाटील ‘आर.एम.ए. सुंदरी’च्या मानकरी



। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत येथील रायगड मेडिकल असोसिएशनच्या वार्षिक अधिवेशनात यंदा वैद्यकीय क्षेत्रासोबतच सौंदर्य, आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्वाचा अनोखा संगम पाहायला मिळाला. या अधिवेशनाचे प्रमुख आकर्षण ठरली ‘मिसेस आर.एम.ए. सुंदरी २०२६’ ही सौंदर्य स्पर्धा. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत पनवेलच्या दंतचिकित्सक डॉ. प्राजक्ता पाटील यांनी विजेतेपद पटकावत ‘आर.एम.ए. सुंदरी २०२६’ हा बहुमान मिळवला.

कर्जत येथील क्राउन व्हिला येथे पार पडलेल्या या सोहळ्याचे आयोजन रायगड डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आशुतोष कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. सांस्कृतिक सचिव डॉ. सुप्रिया घोसाळकर, डॉ. वर्षा मोरे, डॉ. शर्वाणी कुलकर्णी, डॉ. शीतल कराळे, डॉ. जयश्री देशमुख आणि त्यांच्या संपूर्ण टीमने या स्पर्धेचे अतिशय नियोजनबद्ध आयोजन केले होते.

या सौंदर्य स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील विविध भागांतील महिला डॉक्टरांनी सहभाग घेतला होता. बुद्धिमत्ता, आत्मविश्वास, संवाद कौशल्य आणि व्यक्तिमत्त्वाच्या आधारे परीक्षकांनी विजेत्यांची निवड केली. स्पर्धेत दुसरा क्रमांक खोपोलीच्या डॉ. पल्लवी डोंबाले यांनी, तिसरा क्रमांक कर्जतच्या डॉ. अमृता पाटील यांनी, चौथा क्रमांक खारघरच्या डॉ. अंजू धार यांनी, तर पाचवा क्रमांक खोपोलीच्या डॉ. रश्मी गांधी यांनी पटकावला.

विजेत्या स्पर्धकांना रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आशुतोष कुलकर्णी, सचिव डॉ. प्रशांत गांगल, खजिनदार डॉ. कुमार ओसवाल, रायकोनचे मुख्य कार्यकारी अध्यक्ष डॉ. गणेश साळुंखे आणि कार्यकारी अध्यक्ष डॉ. श्रीपाल जैन यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून मिस महाराष्ट्र पूजा बंदरकर, मिस महाराष्ट्र रनर-अप डॉ. आरती भोजने आणि अभिनेत्री ईशा सूर्यवंशी यांनी काम पाहिले. महिला डॉक्टरांमधील बहुआयामी व्यक्तिमत्त्व, सौंदर्य आणि सामाजिक जाणीव यांचे दर्शन घडवणारी ही स्पर्धा उपस्थितांच्या विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली.

## पावणेदोन लाखांचे दागिने लंपास

**पेण** : पेण पोलीस ठाणे हद्दीतील शंकरनगर येथील मॅंगो होम्स इमारतीतील एका फ्लॅटमध्ये अज्ञात चोरट्याने घरफोडी केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना १५ जानेवारी रोजी सायंकाळी ७ ते १६ जानेवारी रोजी सायंकाळी ७ या कालावधीत घडली. अज्ञात इसमाने हॉलच्या गॅलरीतून स्लायडिंग खिडकी उघडून घरात प्रवेश केला. त्यानंतर बेडरूममधील लाकडी कपाट उघडून त्यातील सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण १ लाख ९५ हजार रुपयांचा माल चोरून नेला. पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा शोध सुरू आहे.

# ज्येष्ठांना मिळाला मायेचा आधार

## अंकुश आपटे यांच्याकडून वॉकिंग स्टिक्सचे वाटप; २५ वृद्धांना मदतीचा हात



**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

पालीतील सामाजिक कार्यकर्ते अंकुश आपटे यांच्यावतीने साठ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना चालण्यासाठी अत्यंत उपयुक्त अशा वॉकिंग ट्रायपॉड स्टिक्स चे नुकतेच वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे वयोवृद्धांना आता कुणाच्याही आधाराशिवाय आत्मनिर्भरपणे चालता येणार आहे.

देऊळवाडा येथील मरीमाता मंदिराच्या परिसरात हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी २५ गरजू वयोवृद्धांना ट्रायपॉड स्टिक्स देण्यात आल्या. हा आधार मिळाल्यानंतर अनेक वृद्धांच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. काही ज्येष्ठ महिलांनी तर थरथरत्या हातांनी अंकुश आपटे यांच्या चेहऱ्यावरून हात फिरवत त्यांना भरभरून आशीर्वाद दिले. हा भावनिक क्षण उपस्थितांच्या हृदयाला स्पर्श करून गेला. यावेळी गावकीचे अध्यक्ष अनंता दंत, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर जगताप यांच्यासह अनेक ज्येष्ठ ग्रामस्थ आणि तरुण कार्यकर्ते उपस्थित होते.

ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आलेल्या सत्काराला उत्तर देताना अंकुश आपटे भावूक झाले. त्यांनी सांगितले की, ''हे संपूर्ण गाव मला नेहमीच सामाजिक कार्यासाठी प्रेरणा देत आले आहे. इथल्या प्रत्येक व्यक्तीसाठी आणि विशेषतः ज्येष्ठांसाठी काम करणे मी माझे कर्तव्य समजतो. आगामी काळात महिला आणि वृद्धांसाठी यापेक्षाही मोठा सेवा उपक्रम राबवण्याचा माझा संकल्प आहे. गावकी अध्यक्ष अनंता दंत आणि उपाध्यक्ष ज्ञानेश्वर जगताप यांनीही आपटे यांच्या कार्याचा गौरव करत, अशा उपक्रमांमुळे समाजात एक सकारात्मक संदेश जात असल्याचे नमूद केले. या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक सध्या सर्वत्र होत आहे.

# रसायनीत आज पेन्शनधारकांचा मेळावा

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनी परिसरातील आणि आसपासच्या भागातील सर्व पेन्शनधारकांना त्यांचे हक्क, प्रलंबित प्रश्न आणि विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती मिळावी, या उद्देशाने एका विशेष मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा सोमवार, दिनांक १९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, रसायनी-मोहोपाडा येथे संपन्न होणार आहे.

सध्या अनेक पेन्शनधारकांना निवृत्तीवेतनासंदर्भातील विविध अडचणी, प्रलंबित लाभ, शासन निर्णयांची अपुरी माहिती, महागाई भत्ता, आरोग्य सुविधा तसेच कागदपत्रांबाबत समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या सर्व महत्त्वाच्या विषयांवर तज्ञ मार्गदर्शकांकडून सखोल आणि स्पष्ट मार्गदर्शन या मेळाव्यात करण्यात येणार आहे.

या मेळाव्यासाठी पश्चिम भारत, महाराष्ट्र राज्य, पश्चिम महाराष्ट्र, पुणे जिल्हा तसेच नवी मुंबई येथील अनुभवी पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

# विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी स्तुत्य उपक्रम



**। महाड । प्रतिनिधी ।**

दहावी आणि बारावीचे वर्ष विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असते. या दोन वर्षात विद्यार्थ्यांच्या जीवनाला वेगळे आणि महत्त्वाचे वळण मिळत असल्याने शिक्षण आणि करिअर घडविण्यासाठी विविध क्षेत्रांची माहिती देण्यासाठी करिअर मार्गदर्शन शिबीर उपयुक्त आहे, असे प्रमुख मार्गदर्शक व व्याख्याते सुनील देवळे यांनी केले.

न्यू इंग्लिश स्कूल रावढळ येथे रेशिम बंधू परिवार सामाजिक विकास संस्थेतर्फे आयोजित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि करिअर शिबिराच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला स्थानिक सल्लागार तथा अध्यक्ष सखाराम जाधव गुरुजी, प्राचार्य मिलिंद देशपांडे, रेशिम बंधू संस्थेचे अध्यक्ष शिवाजी रेशिम आदी उपस्थित होते.

शिबिराच्या माध्यमातून युवकांनी विविध क्षेत्रांची माहिती घेऊन योग्य पर्यायाची निवड करावी आणि जीवनात यश संपादन करावे असे प्राचार्य मिलिंद देशपांडे यांनी म्हटले आहे.अशा विविध योजनांची माहिती शिबिरातून मिळते असे सांगून कौशल्य विकासाच्या माध्यमातूनही चांगले करिअर घडविता येत असल्याने विद्यार्थ्यांनी चांगले कौशल्य प्राप्त करावे, असे आवाहनही रेशिम बंधू संस्थेचे अध्यक्ष शिवाजी रेशिम यांनी केले.या शिबीराचे सूत्रसंचालन हायस्कूलचे शिक्षक संतोष दवंडे यांनी केले.

या करिअर मार्गदर्शन शिबीर कार्यक्रमाचे आयोजक म्हणून रेशिम बंधू परिवार सामाजिक विकास संस्था रावढळचे अध्यक्ष शिवाजी रेशिम, उपाध्यक्ष भरत रेशिम, सचिव ऋषिकेश रेशिम, खजिनदार नंदकुमार रेशिम, उपखजिनदार महेश रेशिम, तेजस रेशिम, अमित रेशिम यांच्यासह शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महत्त्वपर्ण मार्गदर्शन

**दहावी-बारावीनंतर योग्य माहिती न मिळाल्यास चुकीचे क्षेत्र निवडले जाण्याची शक्यता असते, पर्यायाने भविष्यात निराशा पदरात पडते. म्हणून विविध अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक आणि करिअर मार्गदर्शन शिबीर काळाची गरज असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.**



# वीर वाजेकर महाविद्यालयात आपत्तीचे धडे

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

फुंडे येथील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात पाच दिवसीय 'आपत्ती व्यवस्थापन बेसिक ट्रेनिंग कोर्स' यशस्वीपणे पार पडला. या प्रशिक्षणाचे उद्घाटन शशिकांत शिरसाट (सहाय्यक उपनियंत्रक, नागरी संरक्षण दल, उरण) यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर होते.

उरणसारख्या औद्योगिक परिसरात आपत्तीच्या प्रसंगी तत्पर मदत करता यावी, यासाठी तरुण पिढी प्रशिक्षित असणे गरजेचे असल्याचे डॉ. ठक्कर यांनी यावेळी सांगितले. या प्रशिक्षणात आपत्तीचे कार, प्रथमोपचार, जखमींना सुरक्षित ठिकाणी हलवणे, घरगुती साहित्यापासून स्ट्रेचर तयार करणे, आग व पूर परिस्थितीत घ्यावयाची काळजी, दोर व गाठी, संदेशवहन, तसेच सर्पदंशावरील उपचार यांचे सैद्धांतिक व प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना नागरी संरक्षण दलाचे प्रशिक्षण प्रमाणपत्र, स्वयंसेवक सभासद सदस्यत्व व ओळखपत्र देण्यात येणार आहे. समारोपप्रसंगी विद्यार्थ्यांनी प्रशिक्षकांचे आभार मानत हे प्रशिक्षण उपयुक्त व प्रेरणादायी ठरल्याचे मनोगतातून सांगितले. या कोर्ससाठी डॉ. आमोद ठक्कर, डॉ. सत्या ठाकरे यांच्यासह नागरी संरक्षण दलातील अधिकारी व प्रशिक्षकांनी मार्गदर्शन केले.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५




# लोखंडे विद्यालयातील विविध प्रकल्पाचे सादरीकरण

**। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।**

शालेय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण व्हावी असे का घडते याचा शोध लावण्याची जिज्ञासा त्यांच्यामध्ये जागृत करण्यासाठी अगस्त्य इंटरनॅशनल फाऊंडेशनच्या सौजन्याने इनोव्हेशन फेयरचे आयोजन करण्यात येते.

अगस्त्य इंटरनॅशनल फाऊंडेशन च्या सौजन्याने अशोक ल. लोखंडे विद्यामंदिर पिटसई येथील सातवी व आठवीमधील विद्यार्थ्यांनी इनोव्हेशन फेयर २०२५-२६ अंतर्गत विद्यालयात काही प्रोजेक्ट सादर केले. या प्रोजेक्टमध्ये नो पार्किंग अलर्ट, डॉक्टर अपार्टमेंट डिस्पेन्सर, सेफ ड्राइंग सिस्टीम, बस सीट बेल्ट, थिफ अलर्ट, गॅस लिकेज अलार्म, इनोव्हेटिव्ह अटेंडन्स बोर्ड , वॉटर लेवल इंडिकेटर ह्या प्रोजेक्टचा समावेश होता. या प्रोजेक्टचे मूल्यांकन करून विजेत्या प्रथम तीन स्पर्धकांना अगस्त्य फाउंडेशन तर्फे प्रमाणपत्र व आकर्षक गिफ्ट देण्यात आले.

या कार्यक्रम समारंभाचे उद्घाटन या शाळेचे चेअरमन खेळूशेठ वाजे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयातील मुख्याध्यापक अरुण खुळपे, ज्येष्ठ शिक्षक अकील मुलाणी, सुखदेव सवई सर्जे, भागीनाथ बांगर, सुनील तेलंगे, एकनाथ कोळी, रेखा रेडीज, सुप्रिया रेडीज, वरिष्ठ लिपिक दीपक भोसले आदी उपस्थित होते.

# मजूर मिळेनात!

**अलिबाग :** तालुक्यातील शेतकऱ्यांनी भातकापणी झाल्यानंतर भाताच्या उडव्या रचून ठेवल्या आहेत. परंतु, अनेक ठिकाणी मिळणी काढण्यासाठी मजूरच मिळेनासे झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यामुळे पर्याय म्हणून अनेक शेतकरी मळणी यंत्राद्वारे मळण्या काढत येत आहेत.

## जाहीर सूचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली जमीन मिळकत विद्यमान मालक यांचे मालकी ताबे कब्जातील असल्याची ग्वाही विद्यमान मालकाने दिल्यावरून त्यांचे कडून आमचे खरेदीदाराने खालील वर्णनाची जमीन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे. आणि तश्या आशयाची बोलणी त्यांचा व आमच्या खरेदीदाराच्या दरम्यान झाली आहे. सदरची खाली वर्णन केलेली मिळकत ही निर्वेध व बोजविरहित असल्याचा भरवसा आमचा अशिलांना विद्यमान मालक श्रीमती. अनिता अनंत शिंदे यांनी दिला आहे. सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणतीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी खालील पत्यावर त्यांची हरकत लेखी नोंदवावी. मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

| गाव | गट न | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| सारळ तालुका अलिबाग | १३७ | क्षेत्र 0.32.10Hector Ares<br>+पोट 0.01.80Hector Ares<br>खराबा 0.33.90Hector Ares | ८.६९ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचीही वहिवाट दान, गहाण, बक्षीस, लिस, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदि कोणत्याही प्रकारे कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी त्याची हरकत योग्य त्या कागदोपत्री, पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्यावर सही करणार यांच्याकडे कळवावे, तशी कोणाचीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध व बिनजोखीम आहे, असे समजून आमचे खरेदीदार सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मागावून आलेली कोणतीही हरकत आमचे खरेदीदारावर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेनी नोंद घ्यावी.

दिनांक: १९/०१/२०२६ (खरेदीदाराचे वकील)
सही/-
डॉ. ॲड. निहा ए. राऊत
लब्बैक, इस्रायल अली, अलिबाग,
जिल्हा:- रायगड - ४०२२०१९
संपर्क:- ८३७८९६४३३३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशील यांनी खालील वर्णनाची बिनशेती जमीन मिळकत, जमिनीचे विद्यमान मालक यांस कडुन कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | गट नं. | क्षेत्र (आर. चौ.मी) | आकार रु. पै. | भोगवटादाराचे नाव |
|---|---|---|---|---|
| मौजे भिसराई ता. अलिबाग जि. रायगड | १२७ | २६-८०-०० | २६८-०० | देवांग रजनीकांत शाह हर्ष नेमीचंद जैन. |

वरील वर्णनाची बिनशेती जमीन मिळकत व या मिळकतीमध्ये असलेले ग्रुप ग्रामपंचायत परहुर, नमुना नं. ८ प्रमाणे घर मालमत्ता क्र. १६८,१६९,१७०,१७१ व १७२ या निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालक यांनी दिला असून गावचे गाव नमुना नं. सातबारापत्रकी ही त्यांचे नाव मालक म्हणुन दाखल आहे. तरीही सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत यदाकदाचित वरील मिळकतीबाबत कुणाचाही विक्री, दान, गहाण, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारस हक्क, लिज, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट अगर कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्याबद्दलची लेखीहरकत, संबंधितांनी खाली सही करणार यांचेकडे योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासाहित द्यावी. विहित मुदतीत लेखी हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध आहे असे गृहीत धरून सदरील व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारची हरकत आमचे अशील यांचेवर बंधनकारक राहणार नाही, याची सर्व लोकांनी नोंद घ्यावी.

दिनांक :- १८/०१/२०२६
**ॲड. मसीर अ. घोले**
१७, अलिबाग कमर्शियल कॉम्प्लेक्स,
चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहिर नोटीस

सर्व सामान्य जनतेस, हितसंबंधीतास व स्थानिक लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

काही कायदेशीर गुंतागुंतीच्या प्रश्नांमुळे श्री. प्रतिक पी. कुमार यांना तसेच त्यांचे कुलमुखत्यार श्री. बिहारीलाल कन्हैयालाल मोटवानी यांना त्यांनी विकत घेतलेल्या मिळकतीकडे वैयक्तिक लक्ष न देता आल्यामुळे त्यांच्या नावाचे बनावट आधारकार्ड, पॅनकार्ड व इतर ओळखपत्रे तयार करुन बनावट दस्ताऐवजा आधारे तोतया इसमांनी मौजे वडवली तर्फे वरेडी येथील अकृषिक मिळकत क्र. ६९/चे पोट हिस्सेचे क्षेत्र विक्री करण्याकामी हालचाली केल्याचे निदर्शना आल्या नंतर अशा बनावट व तोतया इसमांना श्री. प्रतिक कुमार यांचे मार्फत कायदेशीर नोटीसा निर्गमित करण्यात आलेल्या असून त्यांचे विरुध्द लवकरच संबंधीत पोलिस स्टेशनला तक्रार देणार आहे. त्यामुळे श्री. प्रतिक कुमार यांची कायदेशीर खात्री केल्याशिवाय कोणीही त्यांच्या नावावरील कोणत्याही मिळकतींबाबत कोणत्याही स्वरुपाचा व्यवहार करु नये. त्यात जर कोणाची आर्थिक फसवणुक झाली तर त्यास श्री. प्रतिक कुमार हे जबाबदार राहणार नाही. सबब ही जाहिर नोटीस जनहितार्थ प्रकाशित केली असे...

दि. १९/०१/२०२६

**नोटीस देणार**
**श्री. प्रतिक कुमारकरीता**
**ॲड. काशिनाथ द. शिंदे**
**स्पर्श इमारत, सी विंग, २०४, शेडुंग, पो. अजिवली,**
**ता. पनवेल, जि. रायगड - ४१० २२१**
**मोबा नं. ९३२५२०५३०८/८९९९३७४२६५**

# २५० रक्तदात्यांनी केले रक्तदान



**। खरोशी । प्रतिनिधी ।**

'तुम्ही जगा दुसऱ्यांना जगवा' या उक्तीप्रमाणे जगद्गुरु स्वामी नरेंद्र महाराज यांच्या संस्थानतर्फे रक्तदान हे सर्व श्रेष्ठदान समजले जाते. राज्यात सध्या रक्ताचा तुटवडा भासत असल्याने जगद्गुरु नरेंद्रचार्यजी रामानंदाचार्य दक्षिण पीठ नाणिजधाम-महाराष्ट्र यांच्या कृपाशीर्वादाने पेण शहरात रक्तदान शिबिराचे आयोजन रविवार, दि. १८ जानेवारी रोजी करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराला नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभला.

अनेक सामाजिक उपक्रमा सोबत दरवर्षीप्रमाणे रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. आज झालेल्या पेण शहरात एकाच दिवशी रक्तदान शिबिरात २५० पेक्षा जास्त नागरिकांचे रक्तसंकलन करण्यात आले.

मानवी जीवनात दानाचे महत्त्व अनमोल आहे. परंतु ज्या दानाने कुणाचे आयुष्य वाचते, ते रक्तदान सर्वश्रेष्ठ पुण्य ठरते. समाजात मायक्रोसाइटिक अनिमिया, सिकलसेल, थॅलेसिमिया, हिमोफिलिया, ब्लड कॅन्सर, किडनी फल्युअर अशा गंभीर आजारांशी झुंजणारे हजारो रुग्ण रक्ताच्या एका थेंबासाठी तडफडत असतात. अशा वेळी रक्तदाताच देवदूत ठरू शकतो म्हणून शिबिरात जास्तीत जास्त रक्तदात्यांनी भाग घेऊन रक्तदान केले.

## जाहीर नोटीस

पेण येथील मे. तहसिलदार पेण यांचे कोर्टात कुळ कायदा कलम ७० ब अन्वये
कु.का.क. ७० ब फे.चौ.दा.क्र. ०२/२०२५

१. श्री. कैलास बाळकृष्ण पाटील
रा.कळवे, पो.जोहे.ता. पेण,जि. रायगड — अर्जदार

विरुध्द

१. श्री. हरिभाऊ गजानन पिसाट
२. श्रीम.सरस्वतीबाई गजानन पिसाट — सामनेवाला
वरील १ ते २ रा. कळवे, पो.जोहे, ता.पेण,जि.रायगड

तमाम जनतेस कळविण्यांत येते आहे की, अर्जदार श्री. कैलास बाळकृष्ण पाटील. रा.कळवे, पो. जोहे, ता.पेण, जि.रायगड यांनी पेण येथील मे. तहसिलदार पेण यांच्या कोर्टात खालील वर्णन केलेल्या मिळकतीची कुळ कायदा कलम ७० ब दावा फेरचौकशी प्र.क्र.०२/२०२५ अन्वये कुळ म्हणून नाव दाखल होणेबाबत दावा दाखल केलेला आहे.

जिल्हा व तुकडी रायगड, पोट तुकडी व तालुका पेण, जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती पेण तसेच तलाठी सजा सोनखार यांचे हद्दीतील अर्जदार यांची मिळकत खाली वर्णन केल्याप्रमाणे आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| गाव | गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| कळवे | १० | १/अ/२ | ०-०७-१०<br>पैकी ०-०३-१० | ०.९० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीचे कुळ कायदा कलम ७० ब खालील दाव्याचे संदर्भात सामनेवाला यांस नोटीसा काढण्यांत आलेल्या आहेत. सामनेवाले तसेच अनुसूचित निर्दीष्ट केलेल्या मिळकतीस जिथे जिथे ज्यांचा ज्यांचा हितसंबंध असेल त्यांस अर्जदार हे वरील मिळकतीस कुळ असल्याबाबत/नसल्याबाबत हरकत घेण्याची झाल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी हरकत मा. तहसिलदार पेण यांच्या समोर प्रत्यक्ष हजर राहून अथवा वकीलामार्फत दाखल करावी. दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत दाखल न झाल्यास दाव्याचे कामकाज एकतर्फी चालवून कोर्ट निकाल देऊ शकते. याची समज घ्यावी.

ठिकाण :- पेण
दिनांक : १९/०१/२०२६
सही/-
**(तानाजी शेजाळ)**
तहसिलदार पेण

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे बेलपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मंगेश नारायण पाटील, रा. बेलपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| बेलपाडा | २५०/२ | १-५५-०० | २.८६ |
| | | पो.ख. ०-२५-०० | |
| | | १-८०-०० | |

पैकी श्री. मंगेश नारायण पाटील यांच्या मालकीच्या १ हे. ६५ आर क्षेत्रापैकी उत्तरेकडील ० हे. ६० आर एवढे क्षेत्र

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहीत लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभात सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : १९/०१/२०२६
सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
ए/१, २ तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१

## जाहीर सूचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी गाव नागाव येथील खालील वर्णनाची मिळकत दिवंगत शरद वासुदेव काणे यांच्या खुद्द मालकीची होती.

| सर्व्हे/गट क्रमांक | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.=पै |
|---|---|---|---|
| २३८७ | १ | ०-१४-७० | ४=४४ |

दिवंगत शरद वासुदेव काणे यांनी करून ठेवलेल्या तारीख ३०/०८/१९९९ रोजीच्या मृत्यूपत्राने त्यांनी त्यांची भाची/पुतणी श्रीमती मदुरा महेश मीरचंदानी, त्यावेळी मु. मुंबई आणि आता मु. युनायटेड स्टेट्स् ऑफ अमेरिका (U.S.A.) यांस एक्झिक्युटर नेमले होते. सदर मृत्यूपत्रामध्ये वर नमूद मिळकतीसह अन्य मिळकतींचा समावेश होता. सदर मृत्यूपत्र करणार यांचा त्यानंतर तारीख १५/०९/१९९९ रोजी मृत्यू झाला असून, मृत्यूपत्राचे एक्झिक्युटर यांनी मुंबई येथील उच्च न्यायालयात मृत्यूपत्राचे प्रोबेट मिळण्याकरीता टेस्टामेंटरी पिटीशन ४८२/२००० या क्रमांकाचा अर्ज दाखल केला होता. सदर अर्जानुसार उच्च न्यायालय मुंबई यांनी तारीख ०७/०२/२००३ रोजी प्रोबेट अर्ज मंजूर केला असून, श्रीमती मदुरा महेश मीरचंदानी यांस मृत्यूपत्राचे एक्झिक्युटर म्हणून काम करण्याबाबत आदेशित केले आहे.

सदर प्रोबेट आदेशानुसार प्राप्त झालेल्या अधिकाराने वर नमूद मिळकतीस एक्झिक्युटर म्हणून नाव लावून घेऊन श्रीमती मदुरा मीरचंदानी सदर मिळकत विकणार असून, मृत्यूपत्रांतील अटीनुसार किमतीची रक्कम दिवंगत शरद वासुदेव काणे यांचे भाचे/पुतणे संजय विजय काणे आणि नागेश पांडुरंग भिंडे दोघेही यु.एस.ए. यांना विभागून समान हक्काने देणार आहेत.

आमचे अशिलांचा सदर मिळकत विकत घेण्याचा विचार असून, त्याबाबत एक्झिक्युटर श्रीमती मदुरा मीरचंदानी यांचेबरोबर आमचे अशिलांचे बोलणे झाले आहे. सदर व्यवहार अंतिमतः ठरवून पूर्ण करण्याआधी मिळकतीच्या मालकीहक्काबाबत आणि जडजोखीमीबाबत खातरजमा करणेकरीता सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

तरी, मौजे नागाव येथील गट/सर्व्हे नंबर २३८७ या मिळकतीमध्ये वर नमूद मालकांव्यतिरिक्त इतर कोणाचाही दान, गहाण, साठेकरार, वहिवाट, अग्रहक्क, रक्कमेचा बोजा, पोटगी अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व आमचे अशिल करणार असलेल्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसात नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील आणि त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सही/-
तारीख : १५/०१/२०२६
**ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे**
शांतादुर्गा कोऑप. हौसिंग सोसायटी,
मारूती नाका, अलिबाग-रायगड
मोबाईल : ९२७०१६२९२९

